
सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २६० | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दंगलीतील आरोपीला प्रवेश देणे हा हिंदुत्वाचा अपमान

**मुंबई :** छत्रपती संभाजी नगरमध्ये दंगली भडकवण्याचा आरोप असलेल्या आरोपीला शिवसेनाप्रमुखांच्या सुपुत्राने आपल्या पक्षात प्रवेश देणे, म्हणजे त्यांच्या कडवट हिंदुत्वाचा अपमान आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केला.

बाल दिवसानिमित्त सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबारमध्ये आयोजित कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. रशिद खान मामू यांच्या उबाठामधील प्रवेशाचा धागा पकडत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जोरदार हल्लाबोल केला. ते म्हणाले, हा निर्णय केवळ मतांचे लांगुलचालन करण्यासाठी आहे. अशा प्रकारे व्यक्तीविशेषांना पक्षात सामावून घेणे म्हणजे विचारधारेचा त्याग असून, यातून संबंधित नेतृत्वाची वैचारिक घसरण स्पष्टपणे दिसून येते. विशिष्ट



लोकांचे जोडे चाटायचे आणि त्यातून मते मिळवायची, हा प्रकार महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला साजेसा नाही. सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची तयारी दाखवली जात आहे. मात्र, अशा राजकारणाला जनता भुलणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. देशावर प्रेम करणारे, राष्ट्रनिष्ठ

### सायन येथील गुरूद्वारा गुरू तेग बहादूर दरबारमध्ये मुख्यमंत्र्यांचे वक्तव्य

आणि विचारांशी प्रामाणिक असलेले नागरिक हे सर्व बारकाईने पाहत आहेत. या प्रकारच्या राजकारणाची किंमत संबंधितांना मोजावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

महायुतीत कोणताही संभ्रम नाही!

मुंबई पालिकेत भाजप-शिवसेना एकत्र लढत असल्याची घोषणा कधी होणार, असे विचारले असता फडणवीस म्हणाले, महायुतीची घोषणा करण्याची आम्हाला कोणतीही घाई नाही. आम्ही आधीपासूनच एकत्र आहोत आणि आमच्यात कोणताही संभ्रम नाही. विरोधकांकडून सोडल्या जाणाऱ्या पुड्या या केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी आहेत. आमच्यातील एकजूट कृतीतून दिसते, घोषणांमधून नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुतीन आणि झेलेन्स्की एकत्र येणार असतील, तरच त्यांना घोषणा करावी लागते, असा उपरोधिक टोलादेखील त्यांनी ठाकरे बंधूंच्या युतीला लगावला. त्यांनी घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात त्यांच्यात नेमके काय सुरू आहे, हेच कुणालाच कळत नाही. महायुती योग्य वेळी योग्य पद्धतीने आपली भूमिका जाहीर करेल, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# चौथीही मुलगी झाल्याने जन्मदात्याने केला खून

**जळगाव :** जळगावच्या जामनेर तालुक्यातील मोराड गावात जन्मदात्या पित्याने ३ दिवसाच्या मुलीची डोक्यात लाकडी पाट मारून हत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी पित्याला पोलिसांनी अटक केली आहे. कृष्णा लालचंद राठोड असे २६ वर्षीय अटकेतील आरोपी पित्याचे नाव आहे.



जामनेर तालुक्यातील मोराड गावातील घटना

कृष्णा लालचंद राठोड या या २६ वर्षीय आरोपी पित्याला मुलगा हवा होता, मात्र तीन मुलींनंतर चौथी देखील मुलगी झाल्याने तो संतापला. त्याने ३ दिवसाच्या मुलीची निघृण हत्या केली. आरोपी पित्याने ३ दिवसाच्या मुलीच्या डोक्यात लाकडी पाट घातला आणि तिचा जीव घेतला. घटनेबाबत सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती त्यानंतर पोलिसांनी केलेल्या तपासात हत्या झाल्याचं समोर आला आहे. घटनेमध्ये कुटुंबातील कोणीही फिर्यादी व्हायला तयार नसल्याने स्वतः पोलिसांनी फिर्यादी होऊन हा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी कसून चौकशी केली असता आरोपी कृष्णा लालचंद राठोड या पित्याने चौथी मुलगी झाल्यामुळे तिची हत्या केली असल्याची कबुली दिली. त्यानंतर आता त्याला अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वीर बाल दिवस'निमित्त आयोजित 'कीर्तन समागम' येथे प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार कॅप्टन आर. तमील सेल्वन, आमदार प्रसाद लाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

# दोन वाहनांच्या धडकेत जीवलग मैत्रिणींचा नाहक बळी

**सोलापूर :** सोलापुरातील मोहोळ तालुक्यात दोन वाहनांच्या धडकेमुळे झालेल्या अपघातावर हळहळ व्यक्त होत आहे. कारण या अपघातामध्ये केवळ वाहनांचे नुकसान झाले नसून दोन तरुणींचा नाहक बळी गेला आहे. सोलापूरातील मोहोळ तालुक्यातील पिंपरी गावाजवळ हा भीषण अपघात झाला. ज्यात टेम्पोने दुचाकीला धडक दिली असून दुचाकीवर असलेल्या दोन जिवलग मैत्रिणींना यामध्ये जीव गमवावा लागला आहे. या घटनेवर स्थानिकांनी संतप्त भावना दिसत आहेत.

अकरावीत शिकणारी प्रज्ञा धनाजी कोकाटे आणि तिची बारावीत शिकणारी मैत्रीण स्नेहल काशिनाथ वाघमोडे अशा अपघातात मृत्यू झालेल्या मुलींची नावे आहेत. प्रज्ञा ही दुचाकीवरून स्नेहलला घेऊन मोहोळवरून कुरुल गावाला जात असताना समोरून येणाऱ्या टेम्पोने तिला जोरदार धडक दिली. यावेळी झालेल्या या भीषण अपघातात जिवाभावाच्या मैत्रिणींचा दुर्दैवी अंत झाला. या धडकेत प्रज्ञा जागीच ठार



झाली तर स्नेहल गंभीर जखमी झाल्यामुळे तिला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. प्रज्ञा ही नेताजी महाविद्यालयात शिकत होती तर स्नेहल ही राष्ट्रमाता इंदिरा कन्या महाविद्यालयात शिकत होती.

या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणींचे वय कमी असले तरी त्यांना गाडी चालवण्याची परवानगी कोणी दिली? हा प्रश्न येथे महत्त्वाचा असला तरी, समोरचा टेम्पो चालक कोणत्या वेगाने गाडी चालवत होता? गावातील रस्त्यांवर किती वेगाने गाडी चालवावी? हे प्रश्न उपस्थित होत आहेत.

दरम्यान, पालघरच्या मोखाडा येथील चपलपाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या गाडीचा काल (२५ डिसेंबर) अपघात झाला होता. या अपघातात बारा ते पंधरा विद्यार्थी जखमी झाल्याची माहिती समोर आली होती.

हे सर्व विद्यार्थी शाळेच्या क्रीडा स्पर्धेसाठी एका पिकअप गाडी मधून स्पर्धेला जात होते. मात्र चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने या गाडीचा अपघात झाला. गाडीतील जखमी विद्यार्थ्यांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तर, गंभीर स्थिती असलेल्या काही विद्यार्थ्यांना नाशिकच्या एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते.

# जयंत पाटलांनी घेतली उद्धव ठाकरेंची भेट

**मुंबई :** राष्ट्रवादीच्या युती आणि विलिनीकरणाची चर्चा सुरू असतानाच आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील हे शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट



घेण्यासाठी थेट मातोश्रीवर पोहोचले आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास दोन तास चर्चा झाली. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उद्धव ठाकरे यांना मुंबई महापालिकेसाठी २५ जागांचा प्रस्ताव दिल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान या भेटीनंतर जयंत पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला आहे. आमची चर्चा सुरू आहे, मी शिवसेना ठाकरे गटासोबत युतीच्या चर्चेसाठीच आलो होतो. आमची चर्चा झाली मात्र आम्ही अजून निष्कर्षापर्यंत पोहोचलो नाहीत. आम्ही महाविकास आघाडीमधील घटक आहोत, म्हणून मुंबईमध्ये शिवसेनेसोबत आघाडी व्हावी असा आमचा प्रयत्न आहे. खरं म्हणजे मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट महाविकास आघाडी म्हणून लढवावी असं आम्हाला वाटत होतं. परंतु आमची तेवढी ताकद मुंबईमध्ये नाहीये, मुंबईमध्ये काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट हे दोन मोठे पक्ष आहेत. त्यामुळे आमची जागा वाटपासंदर्भात शिवसेना ठाकरे गटासोबत चर्चा सकारात्मक झाली आहे, असं जयंत पाटील यांनी म्हटलं.

## पुण्यात बनावट स्कॉच आणि विदेशी मद्य जप्त

**पुणे :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उच्च दर्जाच्या बनावट स्कॉच आणि विदेशी मद्यावर पुणे उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई करण्यात आली. बनावट स्कॉच आणि विदेशी मद्याविरुद्ध धडाकेबाज कारवाई करत दोन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. मुंढवा आणून तळेगाव दाभाडे विभागात झालेल्या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली. बनावट मद्य, वाहने आणि मोबाईलसह सुमारे १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# शिवसेनेत नाराजीनाट्य, गोऱ्हेंच्या घराबाहेर ठिय्या

**पुणे :** पुण्यातील नीलम गोऱ्हे यांच्या निवासस्थानाबाहेर एकनाथ शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी जोरदार आंदोलन सुरू केले आहे. आगामी निवडणुकांमध्ये जागावाटपावरून निर्माण झालेल्या तीव्र असंतोषातून हे आंदोलन करण्यात येत आहे. शिवसैनिकांची मुख्य मागणी आहे की, पुणे शहरातून त्यांना १६५ जागांवर स्वबळावर निवडणूक लढवण्याची संधी मिळावी. आंदोलक शिवसैनिकांच्या म्हणण्यानुसार, जागावाटपाचा निर्णय त्यांना विश्वासात न घेता घेण्यात आला आहे. आठ उमेदवार बाहेरून आलेले आहेत, तर सहा उमेदवार प्रमोदनाना भानगिरे यांच्या कुटुंबातील आहेत. यामुळे पक्षासाठी वर्षानुवर्षे राबणाऱ्या निष्ठावंत पदाधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. नीलम गोर्हे त्यांच्या नेत्या असून, त्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त तैनात केला असून, बॅरिकेड्स लावून कार्यकर्त्यांना अडवले आहे.

# कोंढव्यात बेकायदा दारु विक्रेत्या महिलेकडे घबाड

## पोलिसांच्या पथकाने मागवलं नोटा मोजण्याचं मशीन, सापडले तब्बल एक कोटी

**पुणे :** कोंढवा परिसरात बेकायदा दारूविक्री करणाऱ्या महिलेवर कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकाच्या हाती मोठे घबाड लागले. महिलेवर गुन्हा दाखल करून तिच्या घराची झडती घेताना पोलिसांना एका कपाटात मोठ्या प्रमाणात नोटांची बंडले सापडली. रात्री उशिरापर्यंत पोलिसांनी नोटांची मोजदाद केली असता, सुमारे एक कोटी रुपयांचा आकडा समोर आला.

अमरकौर ऊर्फ मद्रीसिंग दादासिंग जुनी (वय ५५), दिलदारसिंग दादासिंग जुनी आणि देवाश्री जुनी यांच्यावर कोंढवा पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत एक कोटी ८५ हजार ९५० रुपये पोलिसांना सापडले. या प्रकरणी कोंढवा पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

कोंढवा बुद्रुक परिसरात व्हीआयआयटी कॉलेजकडून अप्पर इंदिरानगरकडे जाण्याच्या रस्त्यावर काकडे वस्ती आहे. हा संपूर्ण वस्ती भाग आहे. येथील गल्ली क्रमांक दोनमध्ये अमरकौर राहते. या वस्तीत ती बेकायदा गावठी दारूची विक्री करते. पोलिसांनी यापूर्वीही तिच्यावर कारवाई केलेली होती.

> बेकायदा दारूविक्रीसंबंधी कारवाईसाठी कोंढवा पोलिसांचे पथक काकडे वस्तीत गेले होते. त्या वेळी दारूविक्रेत्या महिलेच्या घरी नोटांची बंडले सापडली. शंभर, दोनशे आणि पाचशे रुपयांच्या नोटा होत्या. पंचनामा करून एक कोटी रुपये ताब्यात घेतले आहेत.
>
> – कुमार घाडगे, वरिष्ठ निरीक्षक, कोंढवा पोलिस ठाणे

काकडे वस्ती येथे अमरकौरच्या घरी पुन्हा बेकायदा दारू विक्री होत असल्याची खात्रीशीर माहिती कोंढवा पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे सायंकाळच्या सुमारास सहायक निरीक्षक आफ्रोज पठाण आणि त्यांच्या तपास पथकाने काकडे वस्तीत संबंधित महिलेच्या घरावर छापा टाकला. या



छाप्यात साडेतीन लाख रुपये किमतीचा देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. त्या वेळी त्यांच्याकडे काही प्रमाणात रोकड आढळून आली. त्यामुळे पुढील तपासासाठी घराची झडती घेतली असता, बेडरूममधील कपाटात मोठ्या प्रमाणावर रोख रक्कम आढळून आली. या कारवाईमुळे कोंढवा परिसरात बेकायदा दारूविक्रीबरोबरच काळ्या पैशांच्या व्यवहारावरही प्रकाश पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढील तपास कोंढवा पोलिस करीत असून, आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता आहे.

रोकड मोठ्या प्रमाणावर असल्याने पोलिसांनी तत्काळ नोटा मोजण्याचे मशिन मागवले. रात्री उशिरापर्यंत नोटांची मोजणी पूर्ण झाली. एक कोटी रुपयांहून अधिक रक्कम असल्याचे स्पष्ट झाले. अमरकौरच्या घरात एवढ्या मोठ्या प्रमाणावर रोकड कशी आणि कोणत्या मार्गाने आली, याबाबत ती समाधानकारक माहिती देऊ शकली नाही. त्यामुळे रोकडच्या स्रोताबाबत संशय अधिक बळावला आहे.

रोकड मोठ्या प्रमाणावर आढळून आल्याने कोंढवा पोलिसांनी प्राप्तिकर विभागाला पाचारण केले आहे. रोकड आणि मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### पवार एनडीएमध्ये येतील : शिरसाट

**मुंबई :** शिवसेना नेते मंत्री संजय शिरसाट यांनी एक खळबळजनक दावा केलाय. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार हे आगामी काळात एनडीएमध्ये सामील होऊ शकतात. राजकारणात कोणतीही गोष्ट अशक्य नसते, असे सांगत त्यांनी या शक्यतेने कोणालाही आश्चर्य वाटू नये, असा सूचक इशाराही दिला. दरम्यान संजय शिरसाट राष्ट्रीय नेते आहेत. त्यांना त्याबाबत माहिती असेल असा टोला अंबादास दानवे यांनी लगावलाय. तर एनडीएबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आपल्याला नसल्याची प्रतिक्रिया बावनकुळे यांनी दिलीय.

### जयंत पाटील आणि उद्धव ठाकरेंची बैठक

**मुंबई :** मातोश्रीवर उद्धव ठाकरे आणि जयंत पाटील यांच्यातील बैठकीला सुरूवात. ठाकरेंनी सुरुवातीला शरद पवार गटाला १० जागा सोडल्या होत्या, त्यानंतर आता १५ जागा सोडण्याची तयारी दर्शवली असल्याची माहिती. परंतु राष्ट्रवादी शरद पवार गटाला १११ आणि ११९ या दोन प्रभागांसह १६ जागा हव्या आहेत.

### गुरु गोविंदसिहांनी शेवटपर्यंत आपल्याला वाचवलं : फडणवीस

**मुंबई :** बांगलादेशातील हिंदूसोबत संपूर्ण देश आहे. ते होते म्हणून आपण आज आहोत. आपल्याला त्यांचा इतिहास लक्षात ठेवावा लागणार. गुरु गोविंदसिहांनी शेवटपर्यंत आपल्याला वाचवलं.

### सांगलीत अजित पवारांचा भाजपला धक्का

**सांगली :** सांगली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी अजित पवार गटात इनकमिंग सुरूच आहे. मिरजेतल्या दिग्गज नगरसेवकांच्या प्रवेशानंतर सांगलीतल्या भाजप आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातल्या नगरसेवकांनी आज अजित पवार गटात प्रवेश केलाय. पुण्यामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांगली शहर जिल्हाध्यक्ष पद्माकर जगदाळे यांच्या उपस्थितीत सांगलीतल्या विद्यमान नगरसेवकांनी प्रवेश केलाय. यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अभिजीत भोसले, सेन्हल सावंत आणि भाजपाच्या नसीमा नाईक यांचा समावेश आहे. त्यामुळे ऐन निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार जोरदार इन्कमिंग सुरू आहे.

### भरत गोगावलेंच्या मुलाला अटक होणार?

रायगड : राज्याचे मंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते भरत गोगावले यांचे पुत्र आणि शिवसेना शिंदे गटाचे युवा सेना कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले यांच्या अडचणी वाढल्या आहेत. महाड नगरपालिका निवडणूक काळात मतदानाच्या दिवशी घडलेल्या मारहाणीच्या प्रकरणात विकास गोगावले यांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने तब्बल तीन वेळा फेटाळला आहे. आता महाड पोलीस कोणती कारवाई करणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विकास गोगावले यांना अटक झाल्यास भरत गोगावलेंसाठी मोठा धक्का असणार आहे. महाड नगर परिषदेतील प्रभाग क्रमांक २ मध्ये मतदानाच्या दिवशी झालेल्या राडा प्रकरणी माणगाव न्यायालयाने दोन वेळा, तर मुंबई उच्च न्यायालयाने एक वेळा विकास गोगावले यांचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला आहे. त्यामुळे या प्रकरणात कायदेशीर अडचणी अधिकच वाढल्या आहेत.

### नवनिर्वाचित नगरसेविकेच्या पतीची निर्घृण हत्या

खोपोली : खोपोली शहरात आज सकाळी एक धक्कादायक घटना घडली आहे. नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळेखेंचे पती मंगेश काळेखे यांची निर्घृण हत्या करण्यात आली. मुलाला शाळेतून घरी परत आणत असताना त्यांच्यावर हा हल्ला झाला. ही घटना सकाळी घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश काळेखे मुलाला शाळेत सोडून परत येत असताना हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला केला. हल्लेखोर काळ्या रंगाच्या गाडीतून आले होते. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून, पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, निवडणुकीतील राजकीय वैमनस्यातून हा प्रकार घडला असावा का, या दिशेनेही तपास केला जात आहे.

### क्रेन कोसळून मजुराचा जागीच मृत्यू

**कल्याण :** कल्याण शहरात एका गगनचुंबी इमारतीच्या बांधकामाच्या ठिकाणी भीषण अपघात घडला आहे. येथील विकास डेव्हलपर्सच्या 'रिट्स' या इमारतीचे काम सुरू असताना १७ व्या मजल्यावरून एक अजस्त्र क्रेन अचानक खाली कोसळली. या दुर्घटनेत क्रेनखाली चिरडून एका तरुण कामगाराचा दुर्दैवी अंत झाला आहे, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कल्याणमधील एका गृहनिर्माण प्रकल्पाच्या ठिकाणी बांधकाम साहित्याची ने-आण करणारी क्रेन कोसळून झालेल्या भीषण अपघातात एका मजुराला आपला जीव गमवावा लागला आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रभुराज प्रतिष्ठानच्या वतीने बालकांना शालीचे वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर : त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** दि.२५.१२.२०२५ रोजी प्रभुराज प्रतिष्ठाण, लातूरच्या वतीने माता रमाबाई आंबेडकर रुग्णालय महिला प्रसूती गृह विभाग, लेबर कॉलनी परिसरात लहान बालकांना प्रभुराज प्रतिष्ठाण,लातूर च्या वतीने ४० नवजात बालकांना उबदार चादर वाटप तसेच कष्टकरी परिवारांच्या बालकांना उबदार चादर वाटप करण्याचा उपक्रम हाती घेतला. लहान बालकांना थंडी वाजू नये आणि त्यांची प्रकृती चांगली असावी थंडी पासून बचाव करण्यासाठी त्या बालकांना उबदार चादर विवेक साळुंके यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. थंडीपासून बचाव व थंडीचा सामना करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठाणने पुढाकार घेत लहान बालकांना उबदार चादर त्यांच्या अंगावर मायेची उब चादर पांगरून सामाजिक उपक्रम रबविण्यात आला. यावेळी प्रभुराज प्रतिष्ठाणचे अध्यक्ष ॲड. अजय कलशेट्टी, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. रवींद्र भालेराव, डॉ. रमेश बगडे, ॲड. बाबूराव कदम, ॲड. सुरेश सलगरे, ॲड. त्रिंबक सरदे, श्रीमती स्वाती डोंगरे, वाय. एस.मशायक, विवेक साळुंके, पारस चापसी, डॉ.श्रीराम कोळेकर, दत्तात्रय गायकवाड, दत्ता ढगे, शिरीष माळी, हुसेन पठान, पुष्पा स्वामी, यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



# मनपा निवडणुकीत बंडखोरीची भीती?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महानगरपालिका निवडणुकीत अपेक्षित यश संपादन करण्याच्या उद्देशाने महायुती आणि महाविकास आघाडीतील घटक पक्ष एकत्रित निवडणूक लढविणार असल्याचे आता निश्चित झाले आहे. या सगळ्या संबंधित राजकीय पक्षातील अनेक इच्छुकांना उमेदवारीपासून वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा अनेक इच्छुकांकडून बंडखोरी होण्याची शक्यता बळावल्याने निर्दर्शनास येत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली महायुतीतील घटक पक्ष तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीतील घटक पक्षातील अनेक संभाव्य उमेदवारांना एकंदर परिस्थिती पाहता उमेदवारी मिळण्याची शक्यताही धूसर होताना दिसत आहे. वर्षानुवर्षे आपआपल्या प्रभागात जनसंपर्कावरभर देऊन वातावरण निर्मिती केलेल्या अनेकांना त्याचा फटका बसणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात. त्यामुळे या निवडणुका स्वतंत्रपणे लढवून निवडणुकीनंतर पुन्हा सत्तेसाठी एकत्रित येण्याचे धोरण अवलंबले जावे, असा इच्छुक संभाव्य उमेदवारांचा कयास होता.

मनपा निवडणुकीसाठीच्या नामांकनासाठीचे तीन दिवस उलटूनही अद्याप प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांची यादी निश्चित झालेली नाही. राजकीय पक्ष समोरचा पक्ष कशा प्रकारचा उमेदवार देणार आहे, याची चाचपणी करूनच आपला उमेदवार देण्याच्या दृष्टीने प्रतीक्षेत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

भाजपसह काँग्रेस आघाडीतील घटक पक्ष निवडून येण्याची शक्यता अधिक असणाऱ्या चेहऱ्यांनाच उमेदवारी देण्याचा विचार करत असल्याचेही निर्दर्शनास येत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पक्षांतर करून आलेल्या चेहऱ्यांपैकी अनेकांना भाजप अथवा महायुतीकडून उमेदवारी बहाल केली जाण्याची चिन्हे आधी असल्याचे जाणवत आहे. अशावेळी वर्षानुवर्षे पक्षासाठी खस्ता खाल्लेल्या कार्यकर्त्यांना यावेळीही डावलले जाण्याची शक्यता वाढीस लागली आहे. ही बाब निर्दर्शनास येताच अनेक निष्ठावान कार्यकर्त्यांना पक्षाकडून आपल्याऐवजी पक्षात नव्याने आलेल्या चेहऱ्यांना खात्रीने उमेदवारी मिळणार असेल तर आपण कायमच सतरंज्या उचलायचे काम करत बसायचे का ? असा प्रश्न पडत असल्याचे दृष्टीपथास येत आहे. अनेक कार्यकर्त्यांनी आपआपल्या प्रभागात-परिसरात आपणचभावी उमेदवार असल्याचे सांगून मतदारांची मानसिकता तयार केली आहे. अशावेळी आपल्याऐवजी दुसऱ्यांना मते द्या असे म्हणण्याची पाळी अनेकांवर येणार आहे. हा प्रकार स्वतःसाठी मुलगी पाहून पसंत केल्यानंतर अचानकपणे ऐनवेळी दुसऱ्यासोबत तिचा विवाह लावून देण्याची वेळ एखाद्या वरावर यावी, असाच काहीसा प्रकार या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घडण्याचे संकेत मिळत आहेत. याच कारणावरून मनपा निवडणुकीत बंडखोरीचे प्रमाण वाढण्याचा अंदाज राजकीय वर्तुळात वर्तवला जात आहे.

बंडखोरीचे हे पीक केवळ भाजपातच येणार आहे असे नसून त्याची लागण कमी अधिक प्रमाणात महायुती- महाविकास आघाडीतील घटक पक्षांनाही बसणार आहे. संभाव्य उमेदवार फक्त आपआपल्या राजकीय पक्षाकडून उमेदवारांची अधिकृत यादी घोषित होण्याची वाट पाहत आहेत. एकदा का यादी निश्चित झाली की, संभाव्य उमेदवार आपला निर्णय घ्यायला मोकळे होणार आहेत. बंडखोरीची शक्यता प्रमुख नेत्यांनाही असल्यामुळे कदाचित त्याच कारणावरून उमेदवारांची यादी जाणीवपूर्वक उशिरा जाहीर केली जाण्याची खेळीही प्रमुख राजकीय पक्षाकडून खेळली जाऊ शकते.

राजकीय पक्षाकडून अशी शक्यता गृहीत धरून अनेकांनी आतापासूनच उमेदवारी अर्ज घेऊन तो अगोदरच रीतसर भरून ठेवण्याची तयारी सुरु केल्याचे निर्दर्शनास येत आहे. एकंदर कोणत्या राजकीय पक्षात किती प्रमाणात बंडखोरी होणार हे आत्ताच सांगणे अतिशयोक्तीचे वाटत असले तरी या निवडणुकीत बंडोबांचे पीक वाढणार याबद्दल कोणतीही शंका नाही.

# भादा शाळा इमारतीसाठी ९० लाखांचा निधी मंजूर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या शाळेच्या दुमजली नवीन वर्ग खोल्या बांधकामासह इतर तीन ठिकाणच्या जिप शाळेच्या विविध विकास कामासाठी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत २३ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये मंजूर झाला आहे.



**आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नांना यश**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक गावातील जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था झाल्याने त्या ठिकाणी नव्याने वर्ग खोल्या बांधण्यात याव्यात त्याचबरोबर शाळेच्या परिसरात विकास कामे करण्यात यावीत याकरिता आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

आ. रमेशआप्पा कराड यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या औसा तालुक्यातील मौजे भादा येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला या शाळेच्या जुन्या वर्ग खोल्या पाडून त्याच जागेवर दोन मजली नवीन वर्ग खोल्या बांधणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, विद्युतीकरण, यासह इतर नव्याने बांधकाम करण्यात यावे यासाठी ९० लक्ष रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर लातूर तालुक्यातील मौजे जिल्हा परिषद प्रशाला अंकोली येथे नवीन दोन वर्ग खुल्या विद्युतीकरणासह काम करणे २१ लक्ष ८५ हजार, जिल्हा परिषद प्रशाला धानोरी येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकाम करणे ४ लक्ष ५० हजार आणि रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथील जिल्हा परिषद प्रशाला या शाळेची संरक्षण भिंत बांधकाम करण्यासाठी ९ लक्ष असा एकूण १ कोटी २५ लक्ष ३५ हजार रुपये रुपयाचा निधी मंजूर झाला आहे.

भादा जिल्हा परिषद कन्या शाळेच्या नवीन इमारती बांधकामासह इतर शाळेच्या कामासाठी १ कोटी २५ लक्ष रुपयाचा निधी मिळवून दिल्याबद्दल भादा ग्रामस्थासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह पालकांनी आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त केले आहेत.



# धम्म परिषदेनिमित्त धम्म रॅली उत्साहात संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** अखिल भारतीय आठव्या बौद्ध धम्म परिषदेनिमित्त लातूरमध्ये भव्य धम्म रॅली आयोजित करण्यात आलेल्या भव्य धम्म रॅलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्यावतीने या मंगलमय कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे विधिवत पूजन, धम्म ध्वजारोहन आणि भिक्खू संघाच्या मंगल उपस्थितीत झाली. त्यानंतर भिक्खू संघाने उपस्थित उपासक-उपासिकांना त्रिसरण पंचशील दिले.

देश-विदेशातून आलेल्या भिक्खूंच्या सहभागामुळे या धम्म परिषदेचे महत्त्व अधिकच वाढले असून, बौद्ध धम्माचा शांतता, करुणा व सद्भावनेचा संदेश समाजात प्रभावीपणे पोहोचला आहे.

सकाळच्या पहिल्या सत्रात स. ८ वाजता डॉ. आंबेडकर चौक, लातूर येथे पंचरंगी धम्म ध्वजारोहण करून बुध्द मुर्ती सहीत पू. भिक्खू संघ, बौध्द उपासक-उपासिका यांची भव्य धम्म मिरवणूक निघाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे मुख्य ध्वजारोहण करून मिरवणूकीचे समापन झाले. त्यानंतर महाविहार, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव येथे उदघाटन सत्रात अ. भा. भिक्खू संघ बुध्दगयाचे संघ नायक पू. भिक्खू करुणानंद महाथेरो (दिल्ली) यांच्या हस्ते आठव्या बौध्द धम्म परिषदेचे उदघाट्न संपन्न झाले. प्राचार्य डॉ. खेमधम्मो महाथेरो हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सातकर्णी स्मरणीकेचे विमोचन संपन्न झाले. यावेळी विशेष अतिथी म्हणून प्रख्यात सिने अभिनेते गगन मलिक, माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख, माजी मंत्री तथा आ. संजय बनसोडे आदि मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करा : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महानगरपालिका निवडणुकीसाठी नियुक्त अनेक अधिकाऱ्यांना गत एक ते दीड वर्षात झालेल्या विविध निवडणुकांचा अनुभव आहे. मात्र, तरीही महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया पार पाडताना सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने व गांभीर्याने काम करावे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्व सूचना, नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. निवडणूक प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी यांची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रीमती मानसी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके, संदीप कुलकर्णी, सुशांत शिंदे, रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, आदर्श आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा उपजिल्हाधिकारी आम्रपाली कासोदेकर, महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, वसुधा फड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, श्याम वाखर्डे, उपप्रादेशिक





परिवहन अधिकारी आशीषकुमार अय्यर यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यापासून ते मतमोजणीपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक पार पाडावी. या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अद्ययावत सूचनांचा अवलंब करावा. सर्व मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा, मतदान यंत्रे याबाबत आवश्यक सज्जता करावी. कोणत्याही मतदान केंद्रावर अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. मतदान केंद्रांवर सूचना फलक, दिशादर्शक फलक लावून गर्दी टाळण्यासाठी खबरदारी घ्यावी. तसेच या निवडणुकीसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या ६५ मतदान केंद्रांबाबत पुरेशी प्रसिद्धी करून मतदारांना माहिती द्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेली भरारी पथके, स्थिर निगराणी पथके, व्हिडीओ सर्व्हीलंस टीमसह सर्व पथकांनी सतर्क राहून काम करावे, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी माहिती दिली. महानगरपालिका मतदानासाठी एकूण मतदार, प्रभागनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी व इतर आवश्यक पथकांची स्थापना, मतदान केंद्रांची माहिती, विविध परवानग्यांसाठी एक खिडकी, आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या पथके, मतदार जागृतीसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांबाबत यावेळी सादरीकरण करण्यात आले.

# सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार 'विलास' कारखान्याला जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** मांजरा परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना (तोंडार, ता. उदगीर) या कारखान्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठीचा वसंतदादा शुगर इंन्टिटयुट, पुणे यांच्याकडून दिला जाणारा 'कै. राजे विक्रमसिंह घाटगे सर्वोत्कृष्ट तांत्रिक कार्यक्षमता पुरस्कार'

विलास कारखान्याला जाहीर झाला आहे.

हा प्रतिष्ठित पुरस्कार श्री. छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना, कागल (जि.



कोल्हापूर) यांनी पुरस्कृत केला असून, तांत्रिक उत्कृष्टतेच्या जोरावर विलास कारखान्याने सहकार आणि साखर उदयोगात आपला दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. सदरील पुरस्कार कारखान्याच्या वतीने वसंतदादा शुगर इंन्टिटयुट, पुणे येथे सोमवार दि. २९ डिंसेबर २५ रोजी वार्षीक सर्वसाधारण सभेत प्रदान करण्यात येणार आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेतून आणि माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना प्रगतीपथावर आहे. संस्थापक चेअरमन माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख, माजी आमदार, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांच्या कुशल नेतृत्वामुळेच उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर आणि शिरुरअनंतपाळ या भागातील शेतकऱ्यांच्या ऊसाचा प्रश्न सुटला असून त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आले आहे.

या यशाबद्दल सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख आणि चेअरमन वैशालीताई देशमुख यांनी कारखान्याचे व्हा. चेअरमन, माजी आमदार वैजनाथ शिंदे, कार्यकारी संचालक ए.आर.पवार, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक, ऊसतोडणी मजूर आणि वाहतूक कंत्राटदार या सर्वांचे मनापासून अभिनंदन केले आहे.

## धान्य पुरवठासाठी दरपत्रक सादर करा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलां-मुलींचे वसतिगृह येथे अंदाजे प्रतिदिन १०० विद्यार्थ्यांना दरमहा धान्य खरेदी करण्यात येते. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व धान्य विक्रेता, व्यापारी यांनी १ डिसेंबर, २०२५ ते ३० एप्रिल, २०२६ या कालावधीसाठी सर्व धान्याचे कमीत कमी चार महिन्याचे स्थिर भाव दरपत्रक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, लातूर यांचे नावे २९ डिसेंबर, २०२५ पर्यंत सादर करावेत.

# जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार : प्रा. डॉ. डोंगरे


**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि श्री यशवंतराव चव्हाण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. शिवप्रसाद डोंगरे व प्रा. नागेश सुगरे हे होते.

यावेळी प्रा. वैशाली जयशेट्टे प्रा. शैलेश कानडे प्रा दीपक बजाज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रा.डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना ग्राहक हक्क व ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ग्राहक हा बाजारपेठेचा राजा आहे. जागरूक ग्राहकच मजबूत बाजारपेठेचा आधार असतो. तसेच राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांना ग्राहक हक्कांविषयी जागरूक राहण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी सुरक्षेचा हक्क, माहितीचा हक्क, निवडीचा हक्क, ऐकून घेतले जाण्याचा हक्क तसेच भरपाईचा हक्क याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. नागेश सुगरे यांनी विद्यार्थ्यांना वस्तू खरेदी करताना घ्यावयाची काळजी, तसेच ग्राहकांची फसवणूक झाल्यास न्याय कुठे व कसा मिळवता येतो, याबाबतची प्रक्रिया स्पष्ट केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक बजाज यांनी केले, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. वैशाली जयशेट्टे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दीपक बजाज यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शैलेश कानडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होते.

# राज्यस्तरीय स्पर्धेत 'मुकुंदराज'चे यश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** राज्यस्तरीय शालेय टग ऑफ वार (रस्सीखेच) स्पर्धेत मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदगाव येथील १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट आणि दमदार खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक पटकावत ब्रांझ मेडल व ट्रॉफी मिळवली आहे.

या स्पर्धेसाठी प्रशिक्षक व मार्गदर्शक शेप बी. एम., इरशाद शेख तसेच क्रीडा शिक्षक व्ही. जी. ढाकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या योग्य प्रशिक्षणामुळे व खेळाडूंच्या मेहनतीमुळे हे यश साध्य झाले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. हनुमंत कराड, कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक मुंढे यांनी अभिनंदन केले आहे.

# 'वीर बाल दिवस' सर्वोच्च बलिदानाचा स्मरण दिवस : प्रा. डॉ. चपळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २६ डिसेंबर :** पूज्य साहेबजादा बाबा अजितसिंहजी, बाबा जुझार सिंहजी, बाबा जोरावर सिंहजी, आणि सरदार बाबा फतेहसिंह जी यांनी दिलेल्या सर्वोच्च बलिनादानाचा दिवस म्हणजे वीर बाल दिवस असून तो येणाऱ्या पिढीसाठी आदर्श, प्रेरणा आहे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे यांनी केले. ते महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित वीर बाल दिवसाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे



प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे हे होते.

कार्यक्रमास प्रा. डॉ. विजयकुमार ढोले, प्रो.डॉ. धीरज ह्वते , डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. दीपक चाटे,डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे, यशपाल ढोरमारे, महादेव स्वामी, अजय गायकवाड, सय्यद जलील, गुरुप्रसाद बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यक्रमाधिकारी डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले.

छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महायुतीची निर्णायक बैठक अंतिम टप्प्यात

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :** छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर महायुतीची महत्त्वपूर्ण व रणनीतिक बैठक भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीत आगामी निवडणूक धोरण, युतीची दिशा तसेच जागावाटपाबाबत सखोल आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली.

बैठकीस कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी राज्यमंत्री भागवत कराड, आमदार संजय केणेकर, भाजपा निवडणूक प्रमुख समीर राजुरकर यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, विकास जैन, ऋषिकेश जैस्वाल उपस्थित होते. सर्व वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत युतीच्या घोषणेबाबत अंतिम टप्प्यातील चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

या बैठकीत महायुतीची एकत्रित निवडणूक रणनीती, इच्छुक उमेदवारांची संख्या आणि कार्यकर्त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने संतुलित निर्णय घेण्यावर भर देण्यात आला. युतीची औपचारिक घोषणा आणि जागावाटपाचा निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

आमची बोलणी सुरू आहेत. आम्हाला युतीतच लढायचे आहे. उद्या पुन्हा बैठक होणार असून जागावाटपाचा अंतिम निर्णय घेतला जाईल. दोन्ही पक्षांकडे इच्छुकांची मोठी संख्या असल्याने प्रत्येक कार्यकर्त्याला न्याय देण्याची भूमिका आमची आहे, असे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी बैठकीबाबत माहिती देताना सांगितले की, बैठक अत्यंत सकारात्मक वातावरणात पार पडली. जागावाटपाबाबतची चर्चा सुरू असून उद्या अंतिम फेरीसाठी पुन्हा बैठक होणार आहे. दोन्ही पक्षांनी युतीत निवडणूक लढवणे हेच राजकीयदृष्ट्या आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने अधिक सोयीचे आहे.



# बचत गट चळवळीवर चर्चासत्र संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :** साने गुरुजी व्याख्यानमाला २०२५ अंतर्गत बचत गट चळवळ : काल, आज आणि उद्या या विषयावरील चर्चा सत्र गुरुवारी बीड येथील औटी मंगल कार्यालयात संपन्न झाले. या सत्रात बचत गट चळवळीचा ऐतिहासिक प्रवास, सद्यस्थितीतील योगदान आणि भविष्यातील दिशा यावर सर्वंकष व धोरणात्मक चर्चा करण्यात आली.




चर्चा सत्रात कौसल्या बावणे, किरण घाटगे, गीता कातखडे, छाया गवळी, अयोध्या टपले, कल्पना वखरे, शीतल बळे, अनिता पडुळे, अशोक दुबाले व शुभांगी कुळकर्णी यांनी बचत गट चळवळीतील महिला सक्षमीकरणाच्या संधी, अंमलबजावणीतील अडथळे आणि सुधारणा उपायांवर आपली मते मांडली. प्रत्यक्ष क्षेत्रात कार्यरत असलेल्या रंजना अबूज व संगीता शिंदे यांनी बचत गटांमुळे त्यांच्या जीवनात झालेले सकारात्मक व शाश्वत बदल अनुभवाधारित पद्धतीने मांडले.

सायबर गुन्हे व महिला या विषयावर मिथुन जोगदंड, तर महिला व अंधश्रद्धा या विषयावर नवनाथ नाईकवाडे यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सहाय्यक महाव्यवस्थापक (नियोजन आणि विकास, एफआय) संतोष बी. प्रभावती, यांनी आर्थिक साक्षरता, स्थानिक नेतृत्व, सहभाग व सहकाराच्या माध्यमातून बचत गटांपुढील आव्हानांवर कशी मात करता येईल, याबाबत धोरणात्मक भूमिका स्पष्ट केली.

अध्यक्षस्थानी संगीता पाठक यांनी गेल्या पंचवीस वर्षांतील महिलांच्या अनुभवांचा आधार घेत संघटनात्मक एकजूट अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास एस. के. कुलकर्णी, शेजामा पठाण व अतुल बडवे यांची विशेष उपस्थिती होती. साने गुरुजी व्याख्यानमाला संयोजन समिती व समता प्रतिष्ठान टीमच्या परिश्रमातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# वामनदादा कर्डक साहित्य संमेलनास आजपासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २६ :** राज्य साहित्य संस्कृती मंडळ व मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने लोककवी वामनदादा कर्डक प्रतिष्ठानतर्फे आयोजित दोन दिवसीय लोककवी वामनदादा कर्डक साहित्य संमेलनास आजपासून सुरुवात होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य नगरी, गर्दे वाचनालय सभागृहात होणाऱ्या या संमेलनात एकूण १४ सत्रांमधून सांस्कृतिक, वैचारिक व प्रबोधनात्मक मंथन होणार आहे.

संमेलनाचे उद्घाटन माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते होणार असून कथाकार विलास सिंदगीकर संमेलनाध्यक्ष आहेत. उद्घाटन व विविध सत्रांना आमदार, साहित्यिक, अभ्यासक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. संविधान सन्मान रॅली, ग्रंथप्रदर्शनी, मराठी भाषा संवर्धन, युवक व संविधान, अभिजात मराठी भाषा व वामनदादा कर्डक यांच्या लेखणीतील जीवनमूल्ये या विषयांवर परिसंवाद होणार आहेत. कविसंमेलन, गझल संमेलन, आंबेडकरी जलसा व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे संमेलनाचा समारोप होणार आहे.

सर्व साहित्यिक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# श्री मोहटादेवी विद्यालयात विद्यार्थी समुपदेशन

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि.२६ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे दि २६ डिसेंबर रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी विद्यार्थ्यांना बाल गुन्हेगारी रोखण्यासाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी मनमुराद मोकळ्या चर्चा करून विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न जाणून घेतले. विद्यार्थ्यांच्या तक्रारी, विद्यार्थ्यांना न ऊमेजलेले प्रश्न, पोलीस प्रशासनाचा कार्यभार, करियर मार्गदर्शन, क्षेत्र निवडताना घ्यावयाची काळजी, आदी विषयावर चर्चात्मक बदल घडून आणला.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत शेळके यांनी, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्डिले, ज्योती गायकवाड,



विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश घोरतळे होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी आणि मार्गदर्शक म्हणून बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना मिळालेल्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहलाची भावना निर्माण झाली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुभाष गवई, दीपक सतीश मुखेकर, प्रशांत शेळके, परेश शिंदे, अंजुम पठाण, शंकर शिरसाठ, बद्रीनाथ धरपळे, आदींनी परिश्रम घेतले. शिक्षक आणि पोलीस खांद्याला खांदा लावून जर काम करत असतील तर नवी पिढी सुसंस्कृत घडायला वेळ लागणार नाही हे आजच्या कार्यक्रमामधून सफल झाले आहे. आभार सुभाष गवई यांनी केले.

# सोयगाव जि.प. शाळेत किचन शेडचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२६ डिसेंबर :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,सोयगाव येथे नवीन किचन शेडचे उद्घाटन अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडले.या किचन शेडचे उद्घाटन केंद्रप्रमुख फिरोजी तडवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक किरणकुमार पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली,

कार्यक्रमाची सुरुवात शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शेख अमानुल्ला यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आली. या प्रसंगी उपस्थित पालकांमध्ये उपाध्यक्ष शेख कासिम, पठाण अनिस, देशमुख अब्दुल्ला, शेख रफिक, पठाण सत्तार, सईद देशमुख, शेख अबूबकर, शेख वसीम, जुबेर शहा, अझर देशमुख, वसीम मणियार इत्यादी पालकांचा समावेश होता,

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थी संघ यांच्याकडून शाळेसाठी करण्यात आलेली उल्लेखनीय मदत. माजी विद्यार्थी संघाच्या वतीने शाळेसाठी मोठी पिण्याच्या पाण्याची टाकी,पाणी



फिल्टरचे डबे, डस्टबिन यांसोबतच रुपये १५,०००/ रोख रक्कम शाळा विकास निधीसाठी जमा करण्यात आली. या स्तुत्य उपक्रमासाठी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष जुबेर शाह यांचे उपस्थित मान्यवरांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक शेख विकार यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमावेळी शिक्षकवर्गात रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे तसेच इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.

# ब्राह्मणी गराडा आश्रमशाळेत स्पर्धा परीक्षा कार्यशाळेचा समारोप



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.२६ डिसेंबर :** तालुक्यातील ब्राह्मणी गराडा येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळेत दि.२४ रोजी स्पर्धा परीक्षा कार्यशाळा व मार्गदर्शन कार्यक्रमाचा समारोप उत्साहात पार पडला. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेबाबत जागृती निर्माण होऊन अभ्यासाची दिशा स्पष्ट झाली.

समारोप कार्यक्रमास अंबादास सगट, मुख्याध्यापक विक्रम एडके, आदिवासी निरीक्षक चेतन सोनवणे, विस्तार अधिकारी प्रियंका शेवाळे यांच्यासह शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी अंबादास सगट यांनी स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे संयोजक अतुल धाडबळे यांनी मागील एक महिन्यात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त केले. विस्तार अधिकारी प्रियंका शेवाळे यांनी स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, त्यातील संधी आणि विद्यार्थ्यांनी लवकरच तयारी सुरू करण्याचे आवाहन केले. विशाल मोरे यांनी प्रास्ताविक केले. मुख्याध्यापक एडके यांनी कार्यशाळा यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच प्रशांत मोरे यांनी भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षा व त्यांची तयारी याबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विशाल मोरे तर आभार गजानन चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## पणत्यांनी साकारली भारतमातेची कलाकृती

**छत्रपती संभाजीनगर :** डोंबिवलीत २.५ लाख रंगेबिरंगी पणत्यांमधून साकारलेली भारतमातेची एक अफलातून मोझॅक चित्रनिर्मिती सध्या अतिशय लक्षवेधक ठरत आहे. रंगीत पणत्यांच्या माध्यमातून आकारलेल्या चित्राने जागतिक विक्रम प्रस्थापित केला असून भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराच्या माध्यमातून ही कलाकृती तयार करण्यात आली आहे. ही कलाकृती पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने रसिक प्रेक्षक डोंबिवली जिमखानावर गर्दी करत आहेत.

**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद,**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३२१/२०२५

अर्जदार: १.श्री. संपत शंकर साळवे, उ. वय ६६ गर्ने, रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ह.मु. भांडुप मुंबई.

विरुध्द

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण :- **वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत**

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. डी.आर.सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत शंकर दगडू साळवे हे दि. १०/०५/१९६८ रोजी व भिकाबाई शंकर साळवे ह्या दिनांक ०४/०९/१९८७ रोजी पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हा एकमेव वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार हा मयत शंकर दगडू साळवे व भिकाबाई शंकर साळवे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ३०/०१/२०२६. आज दि. २४/१२/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

**आदेशानुसार**
**विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय के.स्तर सोयगांव**

**प्रत :-१. दिवाणी न्यायालय (क. स्तर), सोयगांव नोटीस बोर्ड. २. ग्राम पंचायत पळासखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.**

# ‘टाटा सॉल्ट’ने गुणवत्तेचा एक नवा मापदंड निर्माण केला

**छत्रपती संभाजीनगर :** टाटा सॉल्ट १९८३ मध्ये सादर झाले. भारताच्या आयोडिन कमतरता विकारावरील लढ्यात हे मीठ मोलाची भूमिका बजावत आहे. भारतातील पहिले राष्ट्रीय स्तरावर ब्रँडेड आयोडिनयुक्त मीठ असा लौकिक असणाऱ्या ‘टाटा सॉल्ट’ने गुणवत्तेचा एक नवा मापदंड निर्माण केला आणि संपूर्ण देशभरातील घरांमध्ये सहज उपलब्ध झाले. आजही, टाटा सॉल्ट हे विश्वास, गुणवत्ता आणि निरोगी जीवनशैलीचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. प्रत्येक कणामधून पोषण पोहोचवण्याच्या आपल्या प्रयत्नांद्वारे, टाटा सॉल्ट भारताच्या पोषणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि एक सशक्त राष्ट्र घडवण्यासाठी कार्यरत आहे.

FPA India
Family Planning Association of India

**फॅमिली प्लॅनिंग असोसिऐशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा**

**पाहिजेत**

**ऊसतोड महिला कामगारांसाठी प्रजनन आरोग्य प्रकल्पावर काम करण्यासाठी खालील पदे भरणे आहेत.**

| पदाचे नाव | पद | मानधन | कामाचे ठिकाण | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| फिल्ड को-ऑर्डिनेटर | ३ पदे (पुरूष/महिला) प्रत्येकी १ पद एका साईटकरीता) | रु. २२,०००/- | बीड (एन.एस.एल. साखर कारखाना, पवारवाडी), माजलगाव; कोल्हापूर (दालमिया भारत साखर कारखाना, आसुर्ले-पोर्ले, पन्हाळा); बार्शी (इंद्रेश्वर शुगर मिल्स लि.); सोलापूर (लोकमंगल ॲग्रो इंडस्ट्रीज लि., बीबी दारफळ उत्तर सोलापूर) | कोणत्याही शाखेचा पदवीधर, एम.एस.डब्ल्यु. अनुभवी उमेदवारास प्राधान्य |
| लिंक वर्कर | ८ पदे (पुरुष/महिला) (प्रत्येक कारखान्यास २ पदे) | रु. ७,०००/- मानधन व रु. १,०००/- प्रवास भत्ता | | १२ वी / ग्रॅज्युएशन अनुभवी उमेदवारास प्राधान्य |

उमेदवाराने आपले अर्ज व बायोडाटा solapur@fpaindia.org या ई-मेलवर बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत. छाननी प्रक्रियेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल व मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण कळविण्यात येईल. (मुलाखतीस येताना उमेदवारांनी आपले शैक्षणिक कागदपत्रांच्या मुळप्रती, अनुभव प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्रे सोबत आणावीत.)

**टीप - वरील पदांची नेमणूक ही प्रकल्प कालावधीपर्यंतच असेल.**

**कार्यालयाचा पत्ता**

**फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा**
**परमेश्वर कोळी समाज मंदिर, दयानंद कॉलेज रोड,**
**जोडभावी पेठ, पोलीस ठाणेजवळ, भवानी पेठ,**
**सोलापूर ४१३००२ फोन नं. ०२१७-२९९११२७, मो.नं. ९०११९०७००१**
**E-mail - solapur@fpaindia.org**

**प्रा.डॉ. एन.बी. तेली** – चेअरपर्सन
**प्रा.डॉ. आयेशा रंगरेज** – व्हाईस चेअरपर्सन

## थोडक्यात...

### दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये क्रिडा दिन उत्साहात



**बिडकीन :** तभा वृत्तसेवा बिडकीन दि २६ डिसेंबर पैठण तालुक्यातील निलजगाव येथे यश बहुद्देशीय शिक्षण संस्था संचालित दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगाव आणि दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल बिडकीन यांच्या सौजन्याने दरवर्षीप्रमाणे या ही वर्षी एक दिवसीय क्रिडा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल, सचिव रोशन जैस्वाल, दुर्गा जूनियर कॉलेज बिडकीनच्या प्राचार्या दर्शना कोकणे, निलजगाव चे मुख्याध्यापक मयूर, स्वामी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात गावातील किशोर मोगल यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. सूत्रसंचालन सचिन साळवे यांनी केले. कार्यक्रमासाठी शाळेतील शिक्षक प्रतीक्षा स्वामी, दिक्षा साबळे, सुनीता चव्हाण, नितीन मोरे, शितल कुमावत, कल्पना साळवे, नैना कहार, पल्लवी औटी, अश्विनी गवई, सीमा वंजारे, कलाबाई गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.

### एमजीएममध्ये दोन दिवसीय हिंदी परिषदेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेसतर्फे ग़ज़लकार दुष्यंत कुमार यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त दोन दिवसीय राष्ट्रीय हिंदी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद रविवार, ४ जानेवारी व सोमवार, ५ जानेवारी २०२६ रोजी एमजीएम विद्यापीठ परिसरात होणार आहे. ‘पूरा रदीफ़, अधूरा क़ाफ़िया’ या विषयावर आधारित या परिषदेत दुष्यंत कुमार यांच्या साहित्यिक योगदानाचे बहुआयामी विश्लेषण करण्यात येणार आहे. त्यांच्या ग़ज़लांमधील सामाजिक वास्तव, संवेदनशीलता, विद्रोही चेतना तसेच समकालीन हिंदी साहित्यावरील प्रभाव यावर अभ्यासपूर्ण मंथन होईल. या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमुळे हिंदी साहित्य, संशोधन व ग़ज़ल परंपरेतील अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी वैचारिक देवाणघेवाणीचे सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. देशभरातील नामवंत साहित्यिक व अभ्यासक या परिषदेत सहभागी होणार आहेत. सहभागासाठी पूर्वनावनोंदणी आवश्यक असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### घरवाली पेडवाली’ : कौटुंबिक विनोदाला नवी उंची

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्ही आपल्या दर्जेदार कौटुंबिक मनोरंजन धोरणाला अधिक बळ देत नवी हलकी-फुलकी विनोदी व काल्पनिक मालिका ‘घरवाली पेडवाली’ प्रेक्षकांच्या भेटीला आणत आहे. सर्वोत्तम विनोदासोबत अलौकिक शक्तींचा अनोखा ट्विस्ट ही या मालिकेची प्रमुख यूएसपी आहे. मालिकेत पारस अरोरा (जीतू पांडे), सीरत कपूर (सावी-घरवाली) आणि प्रियमवदा कांत (लतिका-पेडवाली) यांच्या प्रमुख भूमिका असून, रिचा सोनी, गीता बिष्ट, हर्ष वशिष्ठ, ब्रिज भूषण शुक्ला आणि अमिताभ घाणेकर यांसारख्या अनुभवी कलाकारांचीही साथ लाभली आहे. पेनिन्सुला प्रोडक्शन्स निर्मित ही मालिका १५ डिसेंबरपासून दर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होणार असून, संपूर्ण कुटुंबासाठी हसवणूक करणारे मनोरंजन देण्याचे उद्दिष्ट ठेवते.

### ‘सरू’च्या सेटवर मोहकचा नृत्य अनुभव

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका ‘सरू’मध्ये मुख्य भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री मोहक मटकर हिने सेटवरील अनुभव सांगताना एका खास नृत्यदृश्याची आठवण शेअर केली. शास्त्रीय नृत्यात प्रशिक्षित असलेल्या मोहकने या मालिकेसाठी पूर्णपणे वेगळ्या ‘कठपुतळी’ या लोकनृत्यप्रकाराचे प्रशिक्षण घेतल्याचे सांगितले. कठपुतळी नृत्यात नाजूक हातवारे, भावपूर्ण कथाकथन, लयबद्ध हालचाली आणि परंपरेशी नाते आवश्यक असते. मोहकने सांगितले की, बाहुलीसारख्या सूक्ष्म भावभावना आणि हालचाली आत्मसात करणे आव्हानात्मक होते, मात्र सातत्यपूर्ण सरावामुळे हा अनुभव संस्मरणीय ठरला. हे नृत्यदृश्य केवळ आकर्षणासाठी नसून ‘सरू’च्या मुळांना आदरांजली अर्पण करणारे असल्याचे तिने स्पष्ट केले. सध्या मालिकेत सरूचे आयुष्य वेद (शगुन पांडे) विराधक अनिकाच्या कारस्थानांपासून वाचवण्याच्या संघर्षावर केंद्रित असून नातेसंबंधांतील नाट्य अधिक तीव्र होत आहे. ‘सरू’ दररोज सायंकाळी ७:३० वाजता फक्त झी टीव्हीवर प्रसारित होते.

### बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ट्रॉफी चेन्नईमध्ये दाखल

**चेन्नई :** व्यावसायिक सायकलिंगमधील भारताच्या वाढत्या प्रतिष्ठेचे एक शक्तिशाली प्रतीक असलेली, प्रतिष्ठित आणि वारसा-प्रेरित बजाज पुणे ग्रँड टूर २०२६ ची ट्रॉफी आज चेन्नई येथील एका विशेष समारंभात अनावरण करण्यात आली. या ट्रॉफी टूर कार्यक्रमाला तामिळनाडू सरकारचे युवा कल्याण आणि क्रीडा विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव थिरू डॉ. अतुल्य मिश्रा, आयएएस; तामिळनाडू क्रीडा विकास प्राधिकरणाचे सदस्य सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी थिरू जे मेघनाथन रेड्डी, आयएएस; मायलापूरचे विधानसभेचे सदस्य थिरू धा वेलू; तामिळनाडू सायकलिंग असोसिएशनचे अध्यक्ष थिरू एम सुधाकर; आणि तामिळनाडू क्रीडा विकास प्राधिकरणाच्या महाव्यवस्थापिका श्रीमती एल सुजाता आणि बजाज पुणे ग्रँड टूरचे शर्यत तांत्रिक संचालक थिरू पिनाकी बायसॅक यांच्यासह वरिष्ठ सरकारी आणि क्रीडा मान्यवरांची उपस्थिती लाभली.

### ‘कल्याण ज्वेलर्स’च्या नवीन दालनाचे उद्घाटन!

**लातूर :** भारतातील सर्वात विश्र्वसनीय आणि अग्रगण्य ज्वेलरी कंपन्यांपैकी एक असलेल्या कल्याण ज्वेलर्सने आज महाराष्ट्रातील लातूर येथील कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, मेन रोड येथे आपल्या नवीन शोरूमचा शुभारंभ केला. सुप्रसिद्ध अभिनेत्री जेनेलिया डिसुझा यांच्या हस्ते या शोरूमचे उद्घाटन करण्यात आले. या भागातील ब्रँडची उपस्थिती अधिक मजबूत करणे हे या शोरूमचे उद्दिष्ट आहे. या शोरूममध्ये कल्याण ज्वेलर्सची एकापेक्षा एक सरस उत्कृष्ट डिझाइन्स उपलब्ध आहेत, जसे की, मुहूर्त (लग्नाचे दागिने), मुद्रा (हस्तकला केलेले अँटिक दागिने), निमा इत्यादी अनेक लोकप्रिय इन-हाऊस ब्रँड्स याठिकाणी उपलब्ध आहेत.

### ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर बळकट करणार

**बुलढाणा :** सेव्हलाइफ फाऊंडेशन, मर्सिडीज-बेंझ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या भागीदारीत, झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामीण रुग्णालय, मेहकर, तालुका मेहकर, जिल्हा बुलढाणा येथे ट्रॉमा केअर संसाधने वाढवत आहे. मर्सिडीज-बेंझ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडद्वारे समर्थित, कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) प्रयत्नांतर्गत हा उपक्रम, प्रगत क्रॅश डेटा विश्र्लेषण, समुदाय प्रतिबद्धता, सुधारित ट्रॉमा केअर आणि क्षमता वाढवण्याद्वारे उच्च-जोखीम महामार्गांचे सुरक्षित कॉरिडॉरमध्ये रूपांतर करण्यावर लक्ष केंद्रित करते. या उपक्रमाचा एक भाग म्हणून २६ डिसेंबर २०२५ रोजी सेव्हलाइफ फाऊंडेशनच्या प्रतिनिधींसह डॉ. सुनीता हिवसे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, मेहकर यांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## अग्रलेख...

# एक लाट 'जोडी' दोघां...

कविमनाच्या माणसांकडे द्रष्टेपण असते असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्या मनात उमलणाऱ्या कविकल्पना यादेखील दृष्टान्तासारख्याच असाव्यात. कवीच्या द्रष्ट्या कल्पनांना मान्यता मिळते हे खरे असले, तरी वास्तवालाही कधी कधी अपवादाचा छेद मिळतो, हेही तितकेच खरे. किंबहुना अपवादामुळेच वास्तवाचे सिद्धान्त सिद्ध होतात, असेही म्हटले जाते. 'दोन ओंडक्यांची होते, सागरात भेट, एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गाठ' या 'गदिमां'नी गीत रामायणात उद्धृत केलेल्या दृष्टान्तालाही अपवाद ठरावा, अशा दुर्मिळ गोष्टी कधी कधी घडतात. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेनेच्या गडास गेल्या सुमारे सहा दशकांच्या वाटचालीत अनेक भगदाडे पडली. अनेक बिनीच्या मोहऱ्यांनी पक्षास जय महाराष्ट्र करून आपापल्या वेगळ्या वाटा धरल्या, पण त्यांच्या मनात बाळासाहेबांविषयीच्या ममत्वाचा हळवा कोपरा कायम जिवंत राहिला. पुढे ठाकरे घराण्यातच नेतृत्वाच्या मुद्यावरून निर्माण झालेल्या वादातून खुद्द राज ठाकरे यांनीही शिवसेना सोडली तेव्हा मात्र पक्षाची खऱ्या अर्थाने शकले झाली. या वादाच्या वादळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे वेगळे होणे म्हणजे, सागरात भेटलेल्या दोन ओंडक्यांना लाटेच्या तडाख्याने दूर सारण्यासारखेच ठरले असले, तरी आता दोन दशकांनंतर त्यांनीच या कविकल्पनेस अपवाद असल्याचे सिद्ध करून दाखविले आहे.

उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व स्वीकारण्यास ठाम नकार देऊन राज ठाकरे यांनी २० वर्षांपूर्वी शिवसेना सोडली आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला. 'ज्याला दीड दमडीचेही राजकारण कळत नाही, त्या लोकांसाठी आपण शिवसेनेचे नेतेपद सोडत आहोत' असे सांगून राज ठाकरे यांनी शिवसेनेला पहिले भगदाड पाडले, त्याला दोन दशके पूर्ण झाल्यानंतर एका नव्या लाटेमुळे पुन्हा त्यांना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत जाणे भाग पडले आहे. भाजपाप्रणीत महायुतीने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी पुरती मोडून टाकली. या आघाडीतील अन्य पक्षाप्रमाणेच ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी पराभवाच्या लाटेचा फटका बसला. त्यामुळे अन्य पर्याय जोडण्याचे सारे मार्ग संपल्यानंतर अखेरचा पर्याय म्हणूनच ठाकरे गट आणि राज ठाकरेंचा पक्ष यांच्या युतीकडे पाहावे लागेल.

'जे शिवसेना संपविण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांच्या पापाचा भागीदार होण्याची आपली इच्छा नाही' हे राज ठाकरे यांचे २० वर्षांपूर्वीचे विधान होते. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेस सातत्याने पराभवाच्या लाटा झेलाव्या लागत असून पक्षास लागलेली गळती व गमावत चाललेला जनाधार यांमुळे ही शिवसेना संपण्याची प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली आहे आणि या स्थितीच्या पापाचे खापर कोणाच्या माथ्यावर फोडले जात आहे, हेही स्पष्ट झाले आहे. राज ठाकरे यांनी त्या वेळी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर करताना, या पापात सहभाग नको, अशी भावना व्यक्त केली होती. आता शिवसेना संपविण्याच्या पापात आपला सहभाग नाही हे स्पष्ट झाल्यानंतरच ते पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत आले आहेत. ज्यांना दीड दमडीचेही राजकारण कळत नाही त्यांच्यासोबत काम करण्याची इच्छा नाही, असे त्यांनी पक्षत्यागाच्या वेळी सांगितले, तेव्हा त्या वक्तव्याचा रोख थेट उद्धव ठाकरे यांच्याकडेच होता. गेल्या २० वर्षांत शिवसेनेच्या राजकारणाच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. राज ठाकरे यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शिवसेनेच्या निष्ठावंतांना मोठ्या अपेक्षा होत्या. राज ठाकरे यांच्या तुलनेत तेव्हा फारच तोकडा अनुभव असलेले उद्धव ठाकरे बाळासाहेबांचा राजकीय वारसा समर्थपणे चालवून पक्ष पुढे नेऊ शकतील, याविषयी शंका असलेले अनेक निष्ठावंत राज ठाकरे यांच्याकडे अपेक्षेने पाहात होते, पण त्यांचा अपेक्षाभंग झालाच, पण उद्धव ठाकरे यांच्याविषयीदेखील भ्रमनिरास झाला. ज्यांना दीड दमडीचाही अनुभव नाही असे राज ठाकरे म्हणत होते, त्या उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या राजकारणास बगल देत महाविकास आघाडीचा झेंडा हाती घेऊन राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारली आणि राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या राज ठाकरे यांचा पक्ष मात्र, सत्तेच्या गणितात सातत्याने कच्चा राहिला. या पक्षाला राजकारणातही फारसे स्थान उरले नाही. राजकारणातला अनुभव आणि डावपेचांचा नेमका वापर या दोन वेगळ्या बाबी असल्याचे उद्धव ठाकरे यांनी दाखवून दिलेच, पण आपले राजकारण बाळासाहेबांच्या राजकारणाहूनही दोन पावले पुढचे आहे, याचीही चुणूक त्यांनी दाखविली. बाळासाहेब भोळे होते, मी भोळा नाही तर धूर्त आहे, असे जाहीरपणे सांगणाऱ्या ठाकरेंनी त्याच धूर्तपणाचा वापर करून भाजपासोबतच्या युतीला दगा देऊन शरद पवारांचे बोट धरत महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री पद हस्तगत केले, तेव्हाच कदाचित राज ठाकरे यांना आपल्या २० वर्षांपूर्वीच्या त्या वक्तव्याचा पश्चात्तापही झाला असावा. तेव्हा राजकारणात दीड दमडीचाही अनुभव नसल्याची भावना व्यक्त करणाऱ्या राज ठाकरेंनी नंतरच्या दोन दशकांत उद्धव ठाकरेंच्या राजकारणातील कोलांटउड्यांसकट सारे अनुभव पाहिले आणि भाजपाच्या देशव्यापी लाटेच्या तीव्र तडाख्यामुळे ठाकरेंच्या जर्जर झालेल्या शिवसेनेसोबत पुन्हा जाण्याची वेळ राज ठाकरे यांच्यावर आली. नाराजीच्या लाटेमुळे वेगळे झालेले हे दोन भाऊ भाजपा लाटेच्या तडाख्याने एकत्र आले आणि लाटेच्या तडाख्यात वेगळे झालेले ओंडके पुन्हा भेटत नाहीत या कविकल्पनेस त्यांच्या राजकारणाने छेद दिला.

राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना गेल्या दोन दशकांत महाराष्ट्राच्या राजकारणात आपला ठसा उमटवू शकली नाहीच; उलट या पक्षाचे अस्तित्व वर्षागणीक अधिकाधिक क्षीणच होत गेले. नेतृत्वाचा एकखांबी तंबू असलेल्या कोणत्याही पक्षाची हीच अवस्था होत असते. त्यातही घराण्याच्या पुण्याईची शिदोरी घेऊन राजकारण करणाऱ्यांना ती पुण्याई असेपर्यंतच स्थान टिकविणे शक्य होत असते. ती उतरणीस लागली की, त्यांचे राजकारणही उतरणीस लागते. उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी बाळासाहेबांची पुण्याई होती आणि राज ठाकरेंच्या राजकारणाही बाळासाहेबांच्या पठडीचे संस्कार होते. ही पुण्याई व संस्काराचा वारसा टिकविण्यात हे दोघेही नेते पुरेसे यशस्वी ठरले नाहीत, त्यामुळे बाळासाहेबांच्या राजकारणाचा प्रभावाने भारावलेला मतदारही या दोहोंपासून दुरावत गेला. बाळासाहेबांनी कधीच मान्य केल्या नसत्या अशा अनेक तडजोडी उद्धव ठाकरे यांना अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीत कराव्या लागल्या आणि त्यामध्ये त्यांच्या पक्षाची प्रतिमादेखील पणास लागली. आता राज ठाकरे यांची मनसे आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेस महाराष्ट्राच्या राजकारणातून पुरती गळती लागल्याचे स्पष्ट झाल्याने, अस्तित्वाच्या लढाईचा अखेरचा मार्ग म्हणून या दोघांना अपरिहार्य परिस्थितीने एकत्र आणले आहे आणि आपल्या अस्तित्वाच्या लढाईला मराठी माणसाच्या अस्तित्वाच्या लढाईचा मुलामा देऊन जुन्याच भावनिक मुद्यानिशी आपले उरलेसुरले अस्तित्व जपण्याची धडपड सुरू केली आहे. राज आणि उद्धव यांचे मनोमीलन हा प्रीतिसंगम आहे, असा दावा संजय राऊत यांनी केला होता. त्यावर उत्तर देताना, हा प्रीतिसंगम नसून भीतीसंगम आहे, अशी थेट खिल्ली भाजपाने उडविली होती. मराठी माणसाच्या अस्तित्वाची आणि मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची भीती दाखविण्याचा गुळगुळीत झालेला मुद्दा हेच या उभयतांच्या राजकारणाचे भावी भांडवल असणार हे सिद्ध झाले आहे. मुंबईसारख्या महत्त्वाच्या महापालिकेवर सत्ता होती, तेव्हा मराठी माणसाचे मुंबईतून नामशेष होणारे अस्तित्व जपण्यासाठी उद्धव ठाकरेंच्या पक्षाने काय केले असा सवाल मराठी माणूस आता त्यांना विचारणारच आहे. त्याचे उत्तर देऊन मगच उद्धव आणि राज यांना आपल्या मनोमीलनाच्या हेतूमागील पारदर्शकता सिद्ध करावी लागेल. अन्यथा, आपले राजकारणातून संपत चाललेले अस्तित्व टिकविण्याच्या धडपडीपायी अपरिहार्यतेने एकत्र आलेले कुटुंब एवढाच त्यांच्या युतीचा निष्कर्ष असेल. राज आणि उद्धव यांनाही त्याची जाणीव नसेल असे नाही, पण अन्य कोणताच मार्ग शिल्लक नसेल, तर भाजप लाटेच्या तडाख्यामुळे एकत्र येणाऱ्या या दोघांना आता एकमेकांसोबत राहणे हाच पर्याय शिल्लक राहिलेला असेल.

## विशेष

# 'स्थानिक' निवडणुकांचा सांगावा

**भागा वरखडे**

राज्यात महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुढील महिन्यात होणार असताना नगरपालिका आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीच्या निकालाने पुढे काय होणार, याचे जणू संकेत दिले आहेत. राज्यात ज्यांची सत्ता, त्यांच्याच हाती स्थानिक स्वराज्य संस्था असे गणित आता बऱ्यापैकी रुजवण्यात राजकीय पक्ष यशस्वी झाले आहेत. केरळचा अपवाद वगळता उर्वरित राज्यांमध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून हे सिद्ध झाले आहे. केंद्र आणि राज्याची सत्ता असणाऱ्यांकडे सत्तेची धुरा सोपविल्यास विकास कामांना पैसे कमी पडत नाही, अडवणूक केली जात नाही, हे मतदारांच्या गळी उतरवण्यात राजकीय पक्षांना यश आले आहे. मतदारांमध्ये रुजलेली ही मानसिकता दूर करण्यात विरोधकांना अपयश आले आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत होण्याची अपेक्षा केली जात असताना प्रत्यक्षात बहुतांश ठिकाणी शिवसेना (शिंदे), भाजपा आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांच्यात लढत होऊन संघर्ष झडला. एकत्र येऊन सत्तेचा फायदा घ्यायचा आणि परस्परांवर टीका करून, परस्परांविरोधात लढून विरोधकांचेही राजकीय अवकाश व्यापायाचे, ही भाजपाची रणनीती आता त्यांच्या मित्रपक्षांनीही अंगीकारली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपल्या पक्षांसाठी संपूर्ण राज्य पिंजून काढले. विरोधक मात्र घरातून बाहेरच पडले नाहीत.

भारतीय जनता पक्ष हा फक्त शहरी लोकांचा पक्ष आहे, हा समज या निवडणुकीच्या निकालाने पुन्हा एकदा खोडून काढला. निमशहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही या पक्षाची पाळेमुळे रुजली आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस हे ग्रामीण भागातील पक्ष. आता ग्रामीण भागातूनही त्यांची सद्दी संपवण्यात भाजपला यश आले आहे. महायुतीला मिळालेले यश सरकारमधील तीनही पक्षांच्या प्रमुखांचे आहे. विधानसभेतील निकालाप्रमाणेच एकूण निकालाचे सूत्र आहे. विधानसभा निकालांचे प्रतिबिंब असलेल्या नगरपालिका निवडणुकांच्या निकालात भाजपा राज्यात पहिल्या क्रमांकाचा पक्ष ठरला खरा; पण त्यातून मिळालेला धडाही महत्त्वाचा आहे. अनेक नगरपालिकांमध्ये महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या तीन पक्षांमध्ये लढत झाली आहे. त्यामुळे हा निकाल भाजपा किंवा महायुतीतील पक्ष स्वबळावर लढल्यास निकाल कसे असतील, याची चुणूक किंवा धडा दाखवणाराही आहे. त्यातूनच भाजपाला मित्रपक्षांची गरज आहे, हे अधोरेखित झाल्याचे मानले जात आहे. निवडणुकीत इतिहास घडला, असे फडणवीस म्हणत असताना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केलेल्या भावना पक्षाला विचारात घ्याव्या लागतील. भाजपाने नागपूर, गडचिरोली जिल्ह्यात चांगली कामगिरी केली; मात्र चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसने भाजपला धक्का देत बाजी मारली. ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी या जिल्ह्यांमध्ये चांगली मेहनत घेतली. रायगड जिल्ह्यात शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांचे वर्चस्व दिसून आले. मुक्ताईनगरमध्ये मंत्री गिरीश महाजन यांना फटका बसला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांना रायगडने धडा शिकवला. राज्यभरात काही ठिकाणी महायुती एकत्र लढली, स्थानिक आघाड्या केल्या तर अनेक ठिकाणी महायुतीतील भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यात लढत होती. महायुतीतील तीनही पक्षांनी ७५ टक्के जागा जिंकल्या. भाजपाने पहिला क्रमांक मिळविला असला, तरी सत्तेत असताना शिंदे आणि अजित पवार गटाचीही ताकद वाढली आहे. भाजपा २०२९ मध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवेल, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मध्यंतरी कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले होते. नगरपालिकांचा निकाल अतिशय मर्यादित स्वरुपाचा आणि स्थानिक राजकारणावर आधारित असला, तरी भाजपाने पुढील काळात स्वबळाचा नारा दिला, तरी त्याला मित्रपक्षांच्या कुबड्या घ्याव्याच लागतील, असा या निकालाचा अर्थ आहे.

ताज्या निवडणुकीप्रसंगी संसाधने, पैसा, यंत्रणा आणि कार्यकर्ते अशा सर्वच बाबतीत महाविकास आघाडीपेक्षा महायुती सरस होती. महाविकास आघाडीमध्ये संवादाचा अभाव होता. राज्यात काही ठिकाणी शिंदेसेना-ठाकरे सेना, काही ठिकाणी शिंदेसेना-काँग्रेस, काही ठिकाणी भाजपाविरोधी सर्व अशा आघाड्या झाल्या. त्यातही महायुतीतील तीन पक्षांचाच फायदा झाल्याचे आकडेवारी सांगते. राज्याच्या कोकण वगळता अन्य सर्वच विभागात भाजपाने जास्त जागा मिळवल्या. शिंदे यांच्या शिवसेनेचा स्ट्राईक रेट जास्त आहे. शिवसेना आता फक्त ठाण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि धुळ्यापासून कोल्हापूरपर्यंत पसरली असल्याचे चित्र दिसले. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे महायुतीतील तीनही पक्ष कमी-अधिक फरकाने राज्यभरात पोचले असून त्यांचे नगराध्यक्ष आणि नगरसेवक निवडून आल्याचे दिसते. नगरपालिका आणि नगर पंचायत निवडणुकीच्या निकालाने महायुतीच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे, तर महाविकास आघाडीला मानसिकता बदलावी लागणार आहे.

राज्यात १५ जानेवारी रोजी २९ महापालिकांच्या आणि त्यानंतर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात १५ जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार आहेत. त्यावर या निकालाचा परिणाम संभवतो. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या बृहन्मुंबई महानगर पालिका आणि इतर २८ महानगर पालिका निवडणुकांसाठी हे निकाल जणू उपांत्य फेरी होते. महाराष्ट्रातील नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. राज्य पातळीवर युती असूनही स्थानिक पातळीवर भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेना अनेक जिल्ह्यांमध्ये एकमेकांविरुद्ध लढल्या. सिंधुदुर्ग, सातारा, धाराशिव, पुणे, नाशिक, पालघर आणि ठाणे यासारख्या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांनी एकमेकांविरुद्ध उमेदवार उभे केले, जिथे सत्ताधारी महायुतीने एकमेकांविरोधात निवडणूक लढवली, तिथे विरोधी महाविकास आघाडीत एकवाक्यता नव्हती. त्याचा महायुतीला फायदा झाला.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# देव, दवा, हवा आणि पाणी!

'द ग्रेट वॉल ऑफ चायना' जगातील सात आश्चर्यांपैकी एक आणि तेही मानवनिर्मित! पण, आपल्याला निसर्गाने त्याहीपेक्षा चांगली सुरक्षा भिंत जवळपास तीन अब्ज वर्षांपूर्वीच दिली. अरावली पर्वतरांग गुजरातमधील माऊंट अबूपासून सुरू होऊन राजस्थान, हरयाणा आणि दिल्लीपर्यंत म्हणजे उत्तरेपासून पूर्वेपर्यंत सुमारे ६९० किमी पसरलेली आहे. अरावलीतील गुरू शिखर हे सर्वोच्च शिखर असून त्याची उंची सुमारे १७२२ मीटर आहे. ही जगातील सर्वात प्राचीन पर्वतरांगांपैकी एक आहे. हडप्पा संस्कृतीच्या काही वसाहती अरावलीच्या आसपास आढळतात. चित्तोडगड, कुंभलगड हे किल्ले अरावलीतच वसलेत. लूनी, बनास आणि साबरमती नद्यांचे उगमस्थान अरावलीने थारचा विस्तार वर्षानुवर्षे रोखून धरला आहे. अरावली म्हणजे पृथ्वीच्या इतिहासाचे जिवंत अवशेष, काळाच्या साक्षीने उभी असलेली भारताची सर्वात प्राचीन नैसर्गिक भिंत! भूगर्भशास्त्राच्या दृष्टीने अरावली ही प्रिकॅम्ब्रियन काळातील निर्मिती असून तिचे आजचे कमी उंचीचे स्वरूप म्हणजे कोट्यवधी वर्षांच्या नैसर्गिक क्षयाचे परिणाम आहेत. ही झीज नैसर्गिक होती; मात्र सध्याची झीज मानवनिर्मित आहे आणि ती अधिक चिंताजनक आहे. या पर्वतरांगेने उत्तर भारताला भौगोलिक ओळख तर दिलीच; सोबत हवामान संतुलनाचे कामही केले. थार वाळवंटाचा विस्तार रोखणे, पावसाच्या ढगांची दिशा बदलणे आणि अनेक नद्यांना जन्म देणे ही सर्व कामे अरावली शांतपणे करत आली. शत्रूंपासून संरक्षण करणारी ही पर्वतरांग आज मात्र स्वतःच्या संरक्षणासाठी आक्रोश करतेय.

अरावलीचे आध्यात्मिक महत्त्वही आहे. आदिवासी बांधवांसाठी हे पर्वत 'भाखर देवता' आणि 'आबू राज' म्हणून पूजनीय आहेत. अरावलीचा विनाश त्यांच्या दैवताचा अपमान आहे. अरावलीच्या लहान-मोठ्या गुहांमध्ये दुर्मिळ औषधी वनस्पती असून त्या आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा मुख्य आधार आहेत. अरावली शुद्ध प्राणवायू, औषधी, पाणी आणि आध्यात्मिक साधनेच्या संधी देणारी अरावली एक परिपूर्ण नैसर्गिक रुग्णालय आहे. नैसर्गिक अनियंत्रित खणन, कल्पनेपलिकडचं शहरीकरण आणि अफाट जंगलतोड, अरावलीच्या मुळावर उठले आहेत. 'ऊस गोड लागला म्हणून मुळापासून खायचा नसतो' ही पूर्वजांची शिकवण साफ विसरून आपण अरावलीला कुरतडत आलोय. काही स्क्वेअर फुटांचा हिशोब मांडणाऱ्या यच्चयावत मानवजातीला अरावलीचा अतिविशाल व्याप, त्यातील नैसर्गिक परिसंस्था आणि त्याचा विनाश समजून घेण्याचा आवाकाच उरलेला नाही. नैसर्गिक अधिवास वेगाने कमी झाल्यामुळे वन्यजीव-मानव संघर्ष वाढतोय. राजधानीत दररोज प्रदूषणाचे नवे विक्रम तयार होत असताना अचानक पूर, दुष्काळ, कडाक्याची थंडी, धुकं किंवा जीवघेणा उकाडा अशा बदलत्या ऋतुचक्राकडे बघायलाही आम्हाला वेळ नाही. उकडतंय मग लावा एसी, हवा प्रदूषित झाली तर लावा प्युरिफायर, थंडी वाढली लावा हिटर... सुखाच्या अतर्क्य कल्पनांसोबत मानव निसर्गाच्या जिवावर उठला आहे. अरावलीचा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नाही तर पुढील पिढ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. कायदे आहेत, न्यायालयांचे आदेश आहेत मात्र, अंमलबजावणीचा अभाव स्पष्टपणे दिसतो. संवर्धनाचे कागदी वाघ नाचवणे आम्ही कधी बंद करणार आहोत? आधीच खूप उशीर झालाय. आता निर्णय प्रत्यक्षात उतरवण्याची वेळ आली आहे.

अरावलीची झुंज निसर्गाशी नाही तर माणसाच्या अमर्याद लोभाशी आहे. काळ, वारा, पाऊस यांना समर्थपणे तोंड देणारी अरावली आज बुलडोझर, स्फोटके आणि प्रशासकीय निष्क्रियतेपुढे हतबल आहे. अरावली ही केवळ पर्वतरांग नाही; ती उत्तर भारताची हिरवी ढाल आहे. या विशाल पर्वतांच्या 'टेकड्या' होणं, हे अपयश केवळ प्रशासनाचे नाही, तर संपूर्ण व्यवस्थेचे नैतिक अपयश आहे. प्रश्न इतकाच की, आपण प्रगती करतोय की, पायाखालची जमीनच उखडतोय? कालच्या निर्णयांवर आज कृती केली नाही तर, उद्या उरणारच नाही. निसर्गाशी संघर्ष करून माणूस कधीच जिंकलेला नाही आणि यावेळीही तो जिंकणार नाहीच. अरावली ही भूतकाळाची आठवण नाही, तर भविष्याचा इशारा आहे. अन्यथा इतिहासात अरावलीचा उल्लेख 'होती एक पर्वतरांग' असा होण्यास फारसा काळ लागणार नाही. अरावली वाचवणे म्हणजे भूतकाळ जपणे नव्हे, तर भविष्य सुरक्षित करणे होय.

९८५०३३९२४०


## दखल

# ठाकरे बंधूंचा प्रीतिसंगम नव्हे, भीतिसंगम!

**मोरेश्वर बडगे**

महाराष्ट्राच्या राजकारणात बरेच काही घडतंय. एकत्रीकरणाचे वारे फिरतेय. राजकीय पक्ष एकत्र येत आहेत. काँग्रेसला स्वबळ आठवले आहे. अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या उबाठा शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणजेच मनसे यांच्या महापालिका निवडणूक युतीची घोषणा झाली आहे. शरद पवार आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे दोन गट पुण्यात एकत्र येत आहेत. ठाकरे बंधूंचे एकत्रीकरण हा प्रीतिसंगम आहे, असे ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. प्रत्यक्षात हा 'भीतिसंगम' आहे. भाजपाच्या भीतीने दोन चुलत भाऊ एकत्र आले आहेत. २०१९ मध्ये आणि नंतर सत्तेच्या राजकारणाने खूप तोडफोड पाहिली. भाजपाला सोडून उद्धव ठाकरे हे शरद पवार आणि काँग्रेसकडे जाऊन बसले. त्यांनी महाआघाडीचे सरकार बनवले. अडीच वर्षातच ते कोसळले. शिवसेना फुटली. ४० आमदारांसह बंड करून एकनाथ शिंदे यांनी सत्तेचे नवे गणित बसवले. नंतर अजितदादा पवार यांनी काकांविरुद्ध तलवार उपसली. तेही आपल्या आमदारांसह महायुतीकडे आले. अशा हवेत कित्येक वर्षांनंतर महापालिकेच्या निवडणुका लागल्या आहेत. त्या पृष्ठभूमीवर पुन्हा उलथापालथ होत आहे. तोडलेले, तुटलेले नेते पुन्हा एकत्र येत आहेत. मुंबईतले जागावाटप ठाकरे बंधू अजून जाहीर करू शकलेले नाहीत. बंडखोरी होऊ नये म्हणून अखेरच्या टप्प्यात ते जाहीर केले जाईल असे दिसते. तिकडे राष्ट्रवादीचे दोन्ही गट म्हणजे काका-पुतण्या एकत्र काम करणार म्हणत आहेत. ते 'घड्याळा'वर लढणार की 'तुतारी'वर याची उत्सुकता असेल. अजितदादा हे महायुती सरकारमध्ये भाजपासोबत असले, तरी पुण्यात भाजपाच्या विरोधात लढणार आहेत. त्याच वेळी मुंबईत भाजपासोबत त्यांची चर्चा सुरू आहे. शरद पवारांचा पक्षही अन्यत्र ठाकरे सेना आणि काँग्रेससोबत आघाडीला उत्सुक आहे. भांडून वेगळे झालेले हे पक्ष एकत्र का येत आहेत हा प्रश्न मतदारांना नक्कीच पडला असणार. त्यांना भाजपाची भीती आहे का? सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटल्याप्रमाणे भाजपाची अवस्था शनी शिंगणापूरसारखी आहे. शनी शिंगणापूरला दरवाजे सदैव उघडे असतात. निवडणुका जाहीर झाल्या असतानाही भाजपाने इनकमिंग थांबवलेले नाही. भाजपाचे तिकीट म्हणजे विजयाची गॅरंटी. त्यामुळे साऱ्यांना भाजपाचे तिकीट हवे आहे. 'एक फूल, पचास माली' अशी परिस्थिती आहे. अशा प्रकारची निवडणूक प्रथमच लोक पाहात आहेत. काय होणार?

किती वातावरण पेटवले होते विरोधकांनी? अनेक महिने मनोज जरांगे पाटील चालवले. बच्चू कडू यांना शेतकरी नेते केले. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी व्होट चोरी, ईव्हीएममधली गडबड तसेच मतदार याद्यांचा गोंधळ हे मुद्दे लावून धरले होते.



मतदार याद्यांमधला घोळ दूर झाल्याशिवाय निवडणुका होऊ देणार नाही, असे खुद्द राज ठाकरेंनी जाहीर केले होते. पण निवडणुका जाहीर होताच ठाकरे बंधू सारे विसरले आणि चूपचाप निवडणुकीच्या कामाला लागले. नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांची तोंडं बंद केली. जिंकले तर लोकांनी जिंकवले आणि हरले तर निवडणूक आयोग काम करतो असे म्हणायचे. नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनी विरोधकांचा दुटप्पीपणा उघडा पडला. उद्धव ठाकरे नगर परिषद निवडणूक हरले, असे म्हणायची सोय नाही. कारण ते निवडणूक लढलेच नाहीत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र पालथा घातला. विकास कामांच्या जोरावर मतं मागितली. कोमट पाणी पिऊन निवडणूक जिंकता येत नाही, हे ठाकरेंनी समजून घेतले पाहिजे. तुम्ही घराच्या बाहेरच पडणार नाही तर मग लोकांकडून कसली अपेक्षा बाळगता? 'अकेला देवेंद्र क्या करेगा?' असे सुप्रिया सुळे एकेकाळी म्हणाल्या होत्या. अकेला देवेंद्र काय काय करू शकतो ते पाच वर्षांत राज्याने पाहिले. नगर परिषद निवडणुकीची त्यांची रणनीती तर मास्टरस्ट्रोक होती. विरोधकांची जागा संपवण्याची रणनीती यशस्वीपणे राबविली गेली. महायुतीतले घटक पक्ष भांडत नव्हते, भांडल्यासारखे दाखवत होते. विरोधकांना अखेरपर्यंत हा गेम समजलाच नाही. मराठी आणि मराठी माणसाच्या मुद्यावर ठाकरे बंधू ही निवडणूक लढवणार आहे. मराठी अस्मितेच्या मुद्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असे ठाकरे बंधूंनी म्हटले आहे. त्यात नवे काही नाही. यांच्याकडे दुसरा मुद्दाच नाही. गेली २५ वर्षे शिवसेना मराठीचाच मुद्दा चालवत आली आहे. दिल्लीला मुंबईचे तुकडे पाडायचे आहेत, हा ठाकरे कुटुंबाचा आवडता आरोप. अगदी बाळासाहेब ठाकरे हेही हेच बोलत. 'फुटाल तर संपाल' या शब्दात यावेळी राज ठाकरे कडाडले आहेत. इतकी वर्षे ठाकरे कुटुंबाकडे मुंबईची सत्ता होती. काय केले यांनी मराठी माणसासाठी? यांच्याच काळात मराठी माणूस मुंबईबाहेर फेकला गेला. महापालिकेचे ठेके कोणाला दिले? यांचे बिझनेस पार्टनर कोण? हे तपासले तर यांचे बेगडी मराठी प्रेम लक्षात येते.

मराठीचा एवढा कळवळा आहे तर राज्यसभेवर पाठवायला यांना अमराठी माणूसच का दिसतो? ठाकरे बंधूंनी आता 'इमोशनल ब्लॅकमेलिंग' सुरू केले आहे. निवडणूक त्यांना भावनात्मक लाटेवर न्यायची आहे. हे काम ते वर्षनुवर्षे करत आले आहेत, पण आता मराठी माणूस भुलणार नाही. मुळात ठाकरे बंधू किती भावनाप्रधान आहेत? ते शुद्ध हिशोबी आहेत. ठाकरे बंधू मराठी अस्मितेसाठी नाही, तर स्वतःच्या अस्तित्वासाठी एकत्र आले आहेत. अन्यथा जे भाऊ २० वर्षे एकत्र येऊ शकले नाहीत त्यांना आज एकत्र यायची गरज वाटावी असे काय आभाळ कोसळले होते? ठाकरे शरद पवारांकडे गेले तेव्हाच 'ठाकरे ब्रँड' संपला होता. पित्याचे कडवे हिंदुत्व सोडून मुस्लिमांचे लांगूलचालन सुरू केले तेव्हा 'ठाकरे ब्रँड' संपला होता. खऱ्या अर्थाने हे दोन भावांचे मनोमिलन नाही. गड वाचवण्याची ही धडपड आहे; पण उशीर झाला. मराठी माणूस हा 'कालचा' राहिलेला नाही. आजचा मराठी माणूस शिकला आहे. नोकरीसाठी इंग्रजी शिकावे लागते हे त्याला उमगले आहे. आजचा मराठी माणूस स्वतःकडे 'हिंदू' म्हणून आधी बघतो. हिंदुत्वाला बाधा आणणाऱ्या शक्ती त्याला अजिबात पसंत नाहीत. त्यामुळे 'ठाकरे ब्रँड' म्हणून जी चर्चा चालते तो ब्रँड चालण्याची किंवा धावण्याची शक्यता दूर दूरपर्यंत नाही. उद्धव ठाकरे यांची मदार मुस्लिम मतांवर आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांना मुस्लिम मतं मिळाली. आपण 'मुस्लिम हृदयसम्राट' झालो असे त्यांना वाटते. म्हणून यावेळी उद्धव 'ममू फॉर्म्युला' चालवू पाहत आहेत. म म्हणजे मराठी आणि मु म्हणजे मुस्लिम. मुंबईत मराठी टक्का ३८ टक्के आहे आणि मुस्लिम टक्का २० ते २३ आहे. पण मुस्लिम मतांचे मोठ्या प्रमाणावर विभाजन होणार आहे. काँग्रेस तसेच एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादांची राष्ट्रवादी यांना हेच काम करायचे आहे. निवडणुका चौरंगी करण्याचा भाजपाचा डाव भाजपाचा गेमप्लॅन यशस्वी झाला आहे. ठाकरे सेना आली तर एखादा खान महापौर होऊ शकतो, असे सांगून भाजप नेते अमित साटम यांनी आग लावलीच आहे. आता मुंबई महापालिका एका कुटुंबाचा व्यवसाय नाही असे भाजपाकडून सांगितले जात आहे. तुम्ही लिहून ठेवा. ठाकरे बंधूंसाठी ही निवडणूक शेवटची असेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### वर्षाअखेरची गर्दी

यावर्षी नाताळ, वीकेंड, इयर एंड हे सगळे ओळीने आल्यामुळे तसेच शासनाच्या निर्णयामुळे काही सुट्या या दिवसात जाहीर केल्यामुळे शाळा, कॉलेजला सुट्या मिळाल्या आहेत. ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी अनेक लोक उत्सुक आहेत. विदेशात राहणारे लोक याच दिवसात मायदेशी येतात. अनेकांचे पर्यटनाचे बेत आखले जातात. त्यामुळे बस प्रवास, रेल्वे प्रवास, विमान प्रवास यात आयत्या वेळी काढलेल्या तिकिटांसाठी भरपूर भाडे आकारले जाते. तसेच पर्यटन स्थळे, जवळपासचे पिकनिक स्पॉट्स येथेही सगळे गर्दी करतात. धार्मिक स्थळी देवळात भली मोठी रांग असते तसेच भक्त निवास गच्च भरलेले दिसतात. याच दिवसात सुट्या असल्याने असे कार्यक्रम आखणे साहजिकच आहे. पण त्याच बरोबर खरोखरीच इतक्या गर्दीत लहान मुलांना किंवा ज्येष्ठांना नेऊन गैरसोय करणे कितपत योग्य आहे याचा विचार व्हावा. या सगळ्या गर्दीचा, पर्यटकांना येणाऱ्या समस्यांचा गैरफायदा घ्यायला गुन्हेगार टपून बसले असतात. डिजिटल अरेस्टचे प्रकारही वाढू शकतात. त्यामुळे अशा प्रकारचे कार्यक्रम आखताना योग्य काळजी घ्यावी. बरेचदा खिशाला परवडत नसतानाही उत्साहात लोक प्रवास करतात. पण गैरसोय झाली तर अतिरिक्त पैशाचा भार सहन करूनही निराशा पदरी पडते. या सगळ्या शक्यता घेऊनच प्रवासाला किंवा एक दिवसीय सहलीला निघावे आणि आनंद घ्यावा.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### शिक्षणात स्वैराचाराचा शिरकाव

महाराष्ट्र विधान मंडळाचे हिवाळी अधिवेशन नुकतेच झाले. अनेक मुद्दे चर्चिले गेलेत. या संपूर्ण चर्चेत राज्यातील शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी व्यसनाधीनतेच्या आहारी जात असल्याची चिंता सभागृहाने व्यक्त केली. हे सत्य आहे की अनेक विद्यार्थी मद्य, मादक पदार्थ, धूम्रपानाच्या मार्गी लागले आहेत. अनेक पालकांना, शिक्षकांना याची साधी कल्पना सुद्धा नाही. हे सर्व समाज विघातक आहे, वेळीच नियंत्रण घालणे शहाणपणाचे ठरेल. मागील एक दोन महिन्यांत घडलेल्या काही घटना बघा. नांदेड जिल्ह्यातील शेकापूर शाळेतील शिक्षकाने वर्गामध्ये दारू पिऊन धिंगाणा घातला. मलकापूर येथे एका शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केला. राजगुरूनगर खेड येथे दहावीतील विद्यार्थ्याकडून वर्गमित्राचा खून करण्यात आला. नागपूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मनोविकास दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापकाचे शिक्षिकेसोबत लज्जास्पद वर्तन. अशाप्रकारच्या अनेक घटना समाज माध्यमावर आपण पाहिल्या. शाळा, महाविद्यालयात कर्मचाऱ्यांच्या टेबल, कपाटातून तंबाखू, सिगारेट, गुटखा, मद्य, अश्लील साहित्य, सीडीज, मेमरी कार्ड्स, मोबाईल्ससारख्या आक्षेपार्ह वस्तू आढळल्या. भांडणे, मारामारी नवीन नाही. काहींनी तर आत्महत्येपर्यंतचे पाऊल उचलले आहे. शासन वेळोवेळी कर्मचाऱ्यांकरिता मूल्यवर्धन प्रशिक्षण सुद्धा आयोजित करतात त्याचं हेच का फलित? विद्यार्थ्यांचे वर्तन सुधारण्यासाठी शाळेला प्रमाणात शिक्षा करता आली पाहिजे आणि ती पालकांनी सुद्धा मान्य करायला पाहिजे. त्याचप्रमाणे शाळा कर्मचारी यांचे आपसातील आणि विद्यार्थ्यांसोबतचे वर्तन योग्य राखण्याकरिता कठोर नियमावली आणि शिक्षा करण्याची गरज आहे. कर्मचारी, विद्यार्थी आपल्या बॅगमध्ये, कपाटात काय ठेवतात? काही आक्षेपार्ह वस्तू असतात काय? यावर सातत्याने तपासण्या, नियंत्रण कोण ठेवणार? शासनाने आणि शिक्षण व्यवस्थापनाने यावर गंभीर विचार करून पावले उचलावीत.घ्यावा.

**प्रा. विलास डोईफोडे**/सावनेर

## आजचे संघगीत-८४

शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५

### दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता

दिशादिशांतुन कोटि मुखांतुन निनाद एकच आता
अजिंक्य आमुची भारतमाता, जय जय भारतमाता ॥धृ॥

इथे जान्हवी नित्य वाहते घेउन अमृतधारा
इथे झुळझुळे मलयगिरीचा शीतल गंधित वारा
धवल हिमालय या भूमीचा जगात उन्नत माथा ॥१॥

इथे जन्मले राम दाविण्या कर्तव्याचा पंथ
कृष्ण सांगती धनंजयाला अमोल गीताग्रंथ
वेदामधुनी इथे वाहती ज्ञानसुधेच्या सरिता ॥२॥

बालशिवाही इथे न झुकवी अधमापुढती मान
प्रतापराणा रणराणीचा असे अम्हा अभिमान
इतिहासातुन इथे रंगते पुरुषार्थाची गाथा ॥३॥

मानवतेची चाड अम्हां परि दानवतेची चीड
सत्यासाठी मनी न कधिही धरू भीति वा भीड
प्राणदीप हा विझवू हासत आम्ही देशाकरिता ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### ॲड.भांबरे व सत्यन गुंडलवार यांचा सत्कार

**परभणी,/प्रतिनिधी :** श्री क्षेत्र त्रिधारा देवस्थान विश्वस्तपदी कर सल्लागार ॲड.राजकुमार भांबरे तर वासवी क्लबच्या इंटरनॅशनल व्हाईस गव्हर्नरपदी सत्यन गुंडलवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल त्या दोघांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माऊली शिंदे, सुरेश उमरीकर, सुभाष भूते, संतोष गायकवाड, महेश सोनी, वेंकटेश भगवतीकर, कर सल्लागार ॲड.संदीप भंडे यांच्यासह अन्य उपस्थित होते. त्यांच्या या नियुक्तीबद्दल अभिनंदन होत आहे.

### कुऱ्हाडी गावात श्रमदानातून वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण

ग्रामस्थांद्वारे एकजुटीचे दर्शन : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

**जिंतूर,/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिंतूर तालुक्यातील मौजे कुऱ्हाडी येथे श्रमदानाच्या माध्यमातून वनराई बंधाऱ्याचे काम यशस्वीपणे पार पडले. जलसंधारण, भूजल पातळी वाढविणे तसेच शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी जिंतूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष मानकर, जिंतूर तालुका कृषी अधिकारी नितीन घुगे, कृषी सहायक संतोष मांदळे व कृषी सहायक गजानन राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कुऱ्हाडी गावचे सरपंच रामकोर गोविंद राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा वनराई बंधारा यशस्वीपणे पूर्ण करण्यात आला. या श्रमदान उपक्रमात गावातील महिला व पुरुष ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सामाजिक एकजुटीचे दर्शन घडविले.

यावेळी अंगणवाडी सेविका सुमनताई राठोड, अंगणवाडी सेविका रामकोर चाफे, रोजगार सेवक बापूराव राठोड यांच्यासह मारोती राठोड, सुभाबाई राठोड, सोभाबाई आडे, सीताबाई चव्हाण, चातुराबाई पवार, सीताराम राठोड, उत्तम चव्हाण, भय्या राठोड, कमलबाई राठोड, वैशाली गायकवाड, सीताराम गायकवाड, महादेव काळे, कैलास चाफे, राजेश आडे, संजय चव्हाण, संतोष राठोड, बाळीराम राठोड, खुशाल घुगे, तुकाराम घुगे, विकास गवळी, आयाजी घुगे, बी. एल. चव्हाण, देविदास चव्हाण, संतोष इंजे, नारायण राठोड तसेच समन्वय समिती सदस्य संतोष गोविंद राठोड यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या श्रमदानातून उभारण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी अडवून त्याची साठवण होणार असून भूजल पातळी वाढण्यास मदत होणार आहे. यामुळे शेतीला बळ मिळून गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. ग्रामस्थांच्या एकजुटीचे, श्रमदानाचे आणि सामाजिक बांधिलकीचे हे कार्य प्रेरणादायी ठरले आहे.

### सेलू तालुक्यातील दिव्यांग बांधवांना वाढीव मानधन तात्काळ द्या : सय्यद युनूस सय्यद सरवर यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी : आंदोलनाचा इशारा

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने दिव्यांग बांधवांचे मासिक मानधन १,५०० रुपयांवरून २,५०० रुपये वाढवून देण्याची घोषणा केली असली, तरी सेलू तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या खात्यात अद्याप वाढीव मानधन जमा झालेले नाही. तसेच मागील दोन महिन्यांचे मानधनही प्रलंबित असल्याने दिव्यांग बांधव आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे हे वाढीव मानधन तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष सय्यद युनूस सय्यद सरवर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

शासनाने ही योजना जाहीर करूनही सेलू तालुक्यात अद्याप तिची अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे दिव्यांग बांधवांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. मानधन न मिळाल्याने दिव्यांगांना दैनंदिन खर्च, औषधोपचार तसेच उदरनिर्वाहासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे तातडीने लक्ष देऊन सर्व प्रलंबित व वाढीव मानधन त्वरित अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.
दरम्यान, प्रशासनाने त्वरित निर्णय न घेतल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### ध्येय निश्चित करून प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते :शिवसांभ सोनटक्के

धर्मापुरी येथे होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

**परभणी,/प्रतिनिधी :** जीवनात ध्येय निश्चित करून त्याच्या दिशेने सातत्याने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवसांभ सोनटक्के यांनी केले.

ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या ज्ञानसाधना जेईई नीट फाउंडेशन, रायरेश्वर माध्यमिक विद्यालय तसेच ज्ञानसाधना प्रतिष्ठान पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसांभ सोनटक्के होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुयश किरण सोनटक्के तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सचिव शितल सोनटक्के उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ज्ञानसाधना सुरसागर गीत संचाने स्वागत गीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक फाउंडेशनचे समन्वयक आर. जी. पोले यांनी केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक डॉ. सुयश सोनटक्के यांनी विद्यार्थ्यांना डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेचे सविस्तर मार्गदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.
संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**
९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# डॉ.रोडगे यांनी सुरभी महोत्सवातून बाल कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उभे केले - वाघमारे

## सुरभी महोत्सवातील रंग मराठी मातीचा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील श्रीराम प्रतिष्ठान आयोजित सुरभि महोत्सवानिमित्य उत्कर्ष विद्यालय व ज्ञानतीर्थ प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचा रंग मराठी मातीचा व गजर माऊलीचा महानाट्याचा सांस्कृतिक कार्यक्रम (२७) वार गुरुवार रोजी विद्याविहार संकुल येथे पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सेलू येथील गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे, प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. सविता रोडगे, रामराव बोबडे, गुलाब ताठे, डॉ. वर्षा गिरी, डॉ. आदित्य रोडगे, शिंदेटाकळीच्या सरपंच अश्विनी पवार, लाडनांदराचे सरपंच रामेश्वर गायकवाड, डॉ.सुनील कुलकर्णी, डॉ.आशिष डख, डॉ. राजेंद्र गात, डॉ. दिगंबर घोडके, ॲड कृष्णा शेरे, संदीप बहिवाल, ज्ञानतीर्थ विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा राधिका पवार, दिलीप डासाळकर, अविनाश चव्हाण, अनिल गजमल, संदीप करवा, निळकंठ काष्टे, प्रा. राजाराम झोडगे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.महादेव साबळे, शाळेच्या मुख्याध्यापक कैलास ताठे, हरिभाऊ कांबळे, शालिनी शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी प्रतिवर्षी प्रमाणे इयत्ता १० वर्गातून कृष्णा रासवे या विद्यार्थ्याला सर्वोत्कृष्ट युवराज तर सई सोनटक्के हिला सर्वोत्कृष्ट युवराज्ञी या पुरस्काराने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय रोडगे व प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार म्हणजे केवळ एका क्षेत्रातील यश नसून, विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचा सन्मान असतो. या मध्ये विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रगती, शिस्त आणि वर्तन, हजेरी, सहशालेय उपक्रम, क्रीडा नैपुण्य, नेतृत्व गुण आदीचे मुल्याकन करण्यात येते. यापुरस्कारातून विद्यार्थ्यामध्ये आत्मविश्वास वाढतो, व्यक्तिमत्व



विकाससह प्रोत्साहन मिळते. सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याच्या उद्धेशाने सुरभी महोत्सव आहे. एक महिन्याहून अधिक विद्यार्थ्यांनी केलेल्या सरावाचे सादरीकरण या सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये बाल कलाकार करत असतात. त्यांना आत्मविश्वास व प्रोस्ताहन उपस्थित पेक्षकाकडून अपेक्षित आहे. आमचा विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर रहावे या दृष्टीकोनातून अश्या प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. असे बोलताना डॉ. संजय रोडगे म्हणाले. सेलू शहर हे मराठवाडयाची सांस्कृतिक राजधानी असून श्रीराम प्रतिष्ठाने आपल्या आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमामधून सेलू शहराची एक वेगळी ओळख डॉ. रोडगे यांनी निर्माण केली आहे. उपस्थित पालकांना विनंती की, विद्यार्थ्यांना खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, भाषण अंगी उतरवले पाहिजे त्यांना प्रेरणा दिली पाहिजे. संस्कारची जडणघडण कश्यापद्धतीने करावयाची हे या शाळेतून दिसते. डॉ.रोडगे यांनी सुरभि महोत्सवातून बाल कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उभे केल्याचे दिसून आले असे प्रतिपादन गजानन वाघमारे यांनी केले. रामराव बोबडे बोलताना म्हणाले की, सुरभि महोत्सव हा श्रीराम प्रतिष्ठानचा उल्लेखनीय उपक्रम असून डॉ. संजय रोडगे यांनी सेलू शहरात शैक्षणीक वातावरणास चांगले वळण देत असल्याचे आज प्रत्यक्षदर्शी येथे आल्यास दिसले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थांना व्यासपीठ तालुक्याच्या ठिकाणी उपलब्ध करून दिले हे विद्यार्थी दशेच्या दृष्टीने खुप महत्वाचे आहे.

गजर माऊलीचा महानाटिकेत १२० हुन अधिक बालकलाकारांणी आपल्या कलाप्रकारातून संत ज्ञानेश्वर यांच्या जीवन पाटावर आधारित नाटिका सादर केली. यामध्ये संत ज्ञानेश्वर , संत निवृत्ती , संत सोपान, संत मुक्ताबाई, विठ्ठलपंत, रुख्मिणी, विसोबापंत, मारबा, चांगदेव, मुग्दल शास्त्री, पाटील, नागा साधू, रायबा आदी प्रमुख पात्र विद्यार्थी विद्यार्थिनींनी साकारले महाराष्ट्रातील सर्व सांस्कृतिची ओळख करून दिली. यामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संत परंपरा आणि वारकरी संस्कृतीची ओळख निर्माण झाली यामध्ये पैठणची धर्मसभा आणि रेड्याच्या मुखातून वेद वदवणे., भिंत चालवण्याचा प्रसंग, चांगदेव भेटीचा प्रसंग, ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती आणि पसायदान आदी प्रसंगाणी मन हरुपून गेले. गजर माऊलीचा महानाटिकेतून ''माणुसकी हाच खरा धर्म'' आणि ''भेदभाव सोडून एकत्र येणे'' हा संदेश देण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये गणेश वंदना, गोंधळ, धनगर गीत, शेतकरी गीत कोळी गीत, बंजारा नृत्य, वारकरी गीत, लावणी आदी महाराष्ट्रातील लोकधारावर आधरित विविध सामुहिक नृत्याचे बालकलाकारांनी सादरीकरण केले. या सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी शाळेतील विद्यार्थी, पालक सेलू शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापक कैलास ताठे यांनी केले. सूत्रसंचालन संजय ठाकर, दिगंबर टाके, संदीप आकात, मिताली ढाले, हर्षदा काष्टे, समृद्धी गाडेकर, अंकिता कदम, साधना काकडे, मृण्मयी गीते यांनी केले.

## मानवतात वीर बाल दिवस उत्साहात साजरा



**मानवत,/ प्रतिनिधी:** दिव्य चैतन्य महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मानवत, जिल्हा परभणी येथे दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी वीर बाल दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष श्री पटेकर सर होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन दिक्षा प्रमोद कोर यांनी केले.
कार्यक्रमास मान्यवर म्हणून श्री जेऊघाले सर, श्री जगाडे सर, श्री पवार सर व श्री मुसाळे सर उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर अश्विनी नाटकर मॅडम यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली.
साहिबजाद्यांच्या शौर्यगाथेवर आधारित माहितीपर व्हिडिओ सादर करण्यात आला. इलेक्ट्रिशियन विभागातील प्रशिक्षणार्थी कुमारी आदिती भोसले व शाम झुटे यांनी मनोगत व्यक्त करून धैर्य, देशप्रेम व कर्तव्याची भावना अधोरेखित केली. त्यांच्या उल्लेखनीय सहभागाबद्दल उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.
कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून श्री जेऊघाले सर यांनी गुरु गोबिंदसिंह महाराजांच्या चार वीर पुत्रांच्या बलिदानाची शौर्यगाथा प्रभावी शब्दांत मांडली. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांना राष्ट्रसेवेत अर्पण केले आहे.


## सहाय्यक बीडीओ सिसोदे यांनी सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्यास बुटाने मारहाण

### नवीन आलेल्या बीडीओच्या सत्काराचे फोटो टाकल्यामुळे वाद

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी:** पालम पंचायत समितीत नरेगा कक्षात बंद खोलीत सहाय्यक गटविकास अधिकारी यु.एस. शिसोदे यांनी सहाय्यक प्रशासन अधिकारी सी.बी. बुलबुले यांना बुटाने मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याची खळबळजनक घटना घडली आहे. मंगळवार २३ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजेच्या सुमारास पालम पंचायत समिती कार्यालयातील नरेगा कक्षात आतून दार बंद करून सहाय्यक गटविकास अधिकारी यु.एस.शिसोदे यांनी सहाय्यक प्रशासन अधिकारी सी.बी.बुलबुले यांना बुटाने मारहाण केल्याची गंभीर व खळबळजनक घटना घडली. 'तू माझ्याविरुद्ध काय करत आहेस..? नवीन रूजू झालेल्या गटविकास अधिकाऱ्यांचे फोटो ग्रुपवर का पाठवतोस ? 'असा जाब विचारत शिसोदे यांनी सी.बी. बुलबुले यांना मारहाण केल्याचे सांगण्यात आले. या वेळी बंद खोलीत शरद पोले नावाचा युवक उपस्थित होता.मारहाणीचा व्हिडिओ शरद पोले यांनी चित्रीत केल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे.मारहाणीदरम्यान शिसोदे यांनी 'खाली ये, मी २५ पोरं आणून तुला बघतो' अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या पूर्वीही शिसोदे यांनी आपल्याला मानसिक त्रास दिल्याचा आरोप सी.बी. बुलबुले यांनी केला आहे. सी.बी. बुलबुले हे पालम पंचायत समितीत सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत असून ते हृदयविकाराचे रुग्ण आहेत. त्यांना लो बीपीचा त्रास आहे. २३ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास त्यांच्या छातीत दुखायला सुरुवात झाली व घाम येऊ लागल्याने सहकाऱ्यांनी त्यांना आराम करण्याचा सल्ला दिला होता. त्याच दरम्यान ही घटना घडल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधिस बोलताना सांगितले. या घटनेनंतर बुलबुले यांनी परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व पालम पोलीस स्टेशन तसेच संबंधित ठिकाणी अर्ज देऊन संपूर्ण चौकशी करून न्याय देण्याची मागणी केली आहे. माझ्या जीवितास काही धोका झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी सहाय्यक बीडीओ यु.एस.शिसोदे यांची राहील, असेही अर्जात नमूद केले आहे. मागील ४ वर्षांपासून पालम पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने आपल्या कार्यालयातीलच हृदयविकाराने पीडित कर्मचाऱ्यास कायदा हातात घेऊन बुटाने मारहाण करणे कोणत्या संवैधानिक चौकटीत बसते, असा प्रश्न पंचायत समिती परिसरात उपस्थित होत आहे. या घटनेमुळे कर्मचारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी,अशी मागणी दबक्या आवाजात कर्मचाऱ्यांतून होत आहे.

## नाताळ सणाच्या नावाखाली हिंदुचे होणारे धर्मांतरण रोखा

**मानवत,/प्रतिनिधी:** नाताळ सणाच्या नावाखाली हिंदू धर्मियांचे धर्मांतरण करण्यात येत असून नाताळ सणाच्या नावाखाली होणारे हिंदुचे धर्मांतरण रोखण्यात यावे अशी मागणी परभणी येथील धर्मजागरण समितीचे जिल्हा संयोजक ॲड. गजानन शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना बुधवार, २४ डिसेंबर रोजी दिले.



नाताळ सणानिमित्ताने चंगाई सभा आणि आर्शिवाद सभेचे आयोजन करुन या सभेत हिंदुचे धर्मांतरण करण्यात येते असा आरोप परभणी येथील धर्मजागरण समितीच्या वतीने करण्यात आला आहे. चंगाई सभा किंवा आर्शिवाद सभेसाठी हिंदू नागरिकांना बोलावून त्यांना रोग मुक्त होण्यासाठी अथवा सैतान मुक्त होण्यासाठी पाण्यात डूबकी मारण्यास सांगण्यात येते. त्यानंतर पाण्यात डूबकी मारणाऱ्या व्यक्तीस पाव खायला देवून आता तुम्ही रोग मुक्त झाले असून आता ख्रिश्चन झाल्याचे सांगण्यात येते असे जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर ॲड. गजानन शिंदे, बाळासाहेब राजूरकर, राजेन मानकेश्वर, गोविंद गोसावी आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### सोनपेठातील श्री सोमेश्वर मंदिरात आजपासून शिवमहापुराण कथा

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** सोनपेठ शहरातील ग्रामदैवत श्री. ोमेश्वर मंदीर दहिखेड येथे प्रतीवर्षाप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या कथेस शनिवार २७ डिसेंबर रोजी प्रारंभ होणार असून शुक्रवार २ जानेवारी रोजी या शिवमहापुराण कथेची शनिवार तर ३ जानेवारी रोजी सप्ताहाची सांगता होणार आहे.

शिवमहापुराण कथेचे यजमान माजी उपनगराध्यक्ष दत्तराव कदम हे असुन शिवमहापुराण कथा प्रवक्ते नामवंत भागवताचार्य हभप नामदेव महाराज फपाळ कौडगावकर हे आपल्या मधुर वाणीतुन कथा सांगणार आहेत. यांना संगीत साथ सागर महाराज, कृष्णा महाराज हाके, ज्ञानराज हारकाळ हे देतील, दैनंदिन कार्यक्रमात पहाटे काकडा आरती, विष्णु सहस्त्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, दुपारी १ ते ४ शिवमहापुराण कथा ज्ञानयज्ञ, हरिपाठ, रात्री ९ वाजता नामवंत किर्तनकारांचे हरिकिर्तन होणार आहे.

## जिंतूरातील त्या वनराई बंधाऱ्याचे काम श्रमदानातून पूर्ण

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मौजे कुऱ्हाडी येथे वनराई बंधारा श्रमदानातून साकार मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत मौजे कुऱ्हाडी गावामध्ये आज श्रमदानातून वनराई बंधाऱ्याचे काम यशस्वीपणे पार पडले. जलसंधारण, भूजल पातळी वाढ आणि शेतीसाठी पाणी उपलब्धतेच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या वेळी जिंतूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. सुभाष मानकर साहेब, जिंतूर तालुका कृषी अधिकारी श्री. नितीन घुगे साहेब, कृषी सहायक श्री. संतोष मांदळे साहेब तसेच कृषी सहायक श्री. गजानन राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. हा वनराई बंधारा कुऱ्हाडी गावचे सरपंच श्री. रामकोर गोविंद राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पूर्ण झाला. या श्रमदान उपक्रमात गावातील महिला व पुरुष ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी अंगणवाडी सेविका सुमनताई राठोड, अंगणवाडी सेविका रामकोर चाफे, रोजगार सेवक बापूराव राठोड यांच्यासह मारोती राठोड, सुभाबाई राठोड, सोभाबाई आडे, सीताबाई चव्हाण,




चातुराबाई पवार, सीताराम राठोड, उत्तम चव्हाण, भय्या राठोड, कमलबाई राठोड, वैशाली गायकवाड, सीताराम गायकवाड, तसेच महादेव काळे, कैलास चाफे, राजेश आडे, संजय चव्हाण, संतोष राठोड, बाळीराम राठोड, खुशाल घुगे, तुकाराम घुगे, विकास गवळी, आयाजी घुगे, बी. एल. चव्हाण सर, देविदास चव्हाण, संतोष इंजे, नारायण राठोड व समन्वय समिती सदस्य संतोष गोविंद राठोड यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या श्रमदानातून उभारण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे पाणी अडवून साठवण होणार असून भूजल पातळी वाढीस मदत होणार आहे. या उपक्रमामुळे शेती व गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असल्याचे मत उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. गावकऱ्यांच्या एकजुटीचे, श्रमदानाचे व सामाजिक बांधिलकीचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले.

# हार्वेस्टरमध्ये अडकून शेतकऱ्याच्या शरीराचे तुकडे

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. २६ डिसेंबर :** अत्याधुनिक हार्वेस्टरने ऊस तोडणी करीत असताना कोपऱ्यातील ऊस गोळा करुन टाकताना तालुक्यातील आशिव येथील शेतकरी शंकर प्रभाकर सावंत वय ४० वर्षे यांच्या शरीराचे तुकडे झाल्याची घटना बुधवारी घडली.या प्रकृरणी भादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औसा तालुक्यातील आशीव येथील शंकर सावंत यांच्या शेतातील उसाला कारखान्याची तोड आली होती. त्यामुळे ते शेतात गेले होते. बुधवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास हार्वेस्टरद्वारे ऊस तोड सुरू होती. यावेळी काही ऊस बाजूला

### आशिव येथील घटना; पोलिस उसाच्या फडात आल्यानंतर झाला उलगडा

पडल्याने तो हार्वेस्टरमध्ये टाकण्याचा प्रयत्न शेतकरी शंकर सावंत करीत होते. तेव्हा, अचानकपणे हार्वेस्टरमध्ये अडकून त्यांच्या शरीराचे तुकडे-तुकडे झाले. दुपारनंतर शेतात न दिसल्याने पत्नी व मुलाने त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली.

दीड दोन तासांनंतर उसाच्या काकरीमध्ये त्यांचा मोबाइल आणि चप्पल आढळून आला. त्यामुळे त्यांनी हार्वेस्टर चालकास विचारणा केली असता, मला काहीही माहिती नाही, असे सांगितले. माय-लेकराने पुन्हा शोधा शोध सुरू केली. रात्री ७ वाजेपर्यंत त्यांचा शोध लागला नाही.

हार्वेस्टर चालकास शेतकरी मशीनमध्ये अडकून मृत्युमुखी पडल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने तत्काळ मशीन बंद केली आणि मालकास माहिती दिली. यादरम्यान मयत शेतकंऱ्यांच्या पत्नी व मुलाने हार्वेस्टर बंद का केले आहे अशी विचारणा केली. मात्र चालकाने मशीन मध्ये बिघाड झाली असल्याचे सांगून खरी माहिती देण्यास टाळाटाळ केली.

मशीन मालकाने या प्रकरणाची माहिती भादा पोलिसांना दिल्यानंतर पोलिस पथक रात्रीच्या सुमारास उसाच्या फडात दाखल झाले.त्यांनी शेतकरी शंकर सावंत यांचा मृतदेह हार्वेस्टर मधून बाहेर काढला. तेव्हा पत्नी व मुलास घटनेची माहिती समजली. या प्रकरणी भादा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक महावीर जाधव पुढील तपास करीत आहेत.

# बोरोळ प्रशालेच्या गणवेश भ्रष्टाचाराची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २६ डिसेंबर :** शालेय गणवेशाच्या रक्कमेची चौकशी करणे, व इयत्ता ९ वी. चे हिंदी या विषयाचा आजपर्यंत एकही पाठ पुर्ण न केले असल्याचे निवेदन शिक्षणाधिकारी प्रा. आणि माध्यमिक जि. प. लातुर यांना देण्यात आले.

### शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांना दिले निवेदन

जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ ता. देवणी येथील शाळेतील गणवेश पात्र विद्यार्थी प्रती गणवेश दर ३०० रुपये प्रमाणे दिव्या साडी सेंटर हडोळती ता. अहमदपूर यांच्या नावाने

> मु.अ. महेश तांदळे यापूर्वी येरोळ, तालुका शिरुर अनंतपाळ येथील प्रशाले मध्ये कार्यरत असताना त्यांना गावकऱ्यांनी शाळेला कुलूप लावून त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही केलेली होती. असे निवेदन कर्ते शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड यांनी सांगितले.

७०८००/- रुपये समायोजन देण्यात आले होते. त्या दुकाणदारांने २००००/- रुपये पेक्षा जास्त रक्कम मु. अ. महेश तांदळे यांना देण्यात आली. याची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. तसेच आठवी ते दहावी या वर्गापैकी इयत्ता नववी या वर्गाचा चालू वर्षाचा हिंदी विषयाचा द्वित्तीय सत्रा पर्यंत अभ्यासक्रम पुर्ण करण्यात




आले नाही. अशी पालक व विद्यार्थ्यांची तक्रार असुन यांची ही चौकशी होऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. उल्लेख केलेल्या विषयाची सबळ पुरावे शालेय समितीकडे उपलब्ध आहेत. यावर वरिष्ठांने तात्काळ चौकशी करून संबंधित मुख्याध्यापकावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अन्यथा अमरण उपोषण करण्यात येईल. असे निवेदन शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे जि. प. लातुर यांना देण्यात आले.

या निवेदनावर शालेय समिती अध्यक्ष सत्यदेव गरड, बालाजी हुंजे, अंकुश पाटील, उर्मिला धनाडे, संजीवन चन्नाळे, सरस्वती पंढरपुरे, महेबुब मुंजेवार सह अदिंची स्वाक्षऱ्या आहेत.

# मातृभूमीच्या वतीने एड्स जन जागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २६ डिसेंबर :** येथील मातृभूमी महाविद्यालय कस्तुराबाई नर्सिंग स्कूल मातृभूमी नर्सिंग स्कूल च्या वतीने जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीचे उद्घाटन सामान्य रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक पांडूरंग दोडके व मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सतीश ऊसतुरे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्या उषा कुलकर्णी बि समुपदेशक शशिकांत महालिंगे,उमाकांत कांबळे. इंगळे, सोनकांबळे रणजित पाटील, प्रा सय्यद उस्ताद, प्रा रणजित मोरे, प्रा शितल पवार, प्रा शिवांगी वट्टमवार, काळे अस्विनी, प्रा काकरे प्रतीक्षा, ग्रंथपाल उषा सताळकर, रामकिशन भोसले, मादळे प्रदीप, दीपक रणदिवे, दयानंद टाके, विवेक देवर्षे, मयुर मुळे, संगीता दुडे, सय्यद सिमा, प्रकाश गायकवाड, जगदिशा ओंकारे , मुबारक पटेल, अर्चना बिरादार यांच्यासह शिक्षक शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. रॅलीचे उद्घाटन मातृभूमी महाविद्यालयात परत रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक सामान्य रुग्णालय येथून जात समारोप मातृभूमी महाविद्यालयात करण्यात आला.



# चाकूर पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी वाघमारे; सचिवपदी पाटील

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २६ डिसेंबर :** चाकूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संग्राम



वाघमारे तर सचिवपदी संजय पाटील यांची मतदानाद्वारे निवड करण्यात आली. या निवडीचे सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत व अभिनंदन होत आहे.

रविवारी दि.२५ डिसेंबर रोजी शासकीय विश्रामगृह येथे ही निवडणूक घेण्यात आली. ३५ सदस्यांनी मतदान नोंदणी केली. या निवडणुकीत अध्यक्षपदासाठी ४ आणि सचिव पदासाठी २ उमेदवार रिंगणात होते. यामध्ये अध्यक्षपदासाठीचे उमेदवार संग्राम वाघमारे यांनी सर्वाधिक मते घेतली. तर सचिव संजय पाटील यांना सर्वाधिक मते पडली यामध्ये अध्यक्ष संग्राम वाघमारे आणि सचिव संजय पाटील यांना निवडणूक निर्णय अधिकारी विनोद नीला, सुधाकर हेमनर आणि संगमेश्वर जनगावे यांनी विजयी घोषीत केले.

या निवडणूकीत निवडणूक निर्णय अधिकारी विनोद नीला, सुधाकर हेमनर आणि संगमेश्वर जनगावे यांनी काम पाहिले. दरम्यान पत्रकार संघाच्या वतीने नूतन अध्यक्ष सचिवांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी पत्रकार संघांचे संस्थापक प्रशांत शेटे, माजी अध्यक्ष माधव वाघ, माधव तरगुडे, शिवशंकर टाक, सदाशिव मोरे, पत्रकार राजकुमार जगताप, माजी सचिव अशोक बिराजदार, माजी सचिव सतिश गाडेकर, साखराप्पा वाघमारे, दयानंद सूर्यवंशी, दत्ता मेहकरे, बापूराव माने, उद्धव दुवे, सुशील वाघमारे, माजी सचिव विकास स्वामी, दत्तात्रय बेंबडे, किशन वडारे, पांडुरंग साळुंके, युसूफ शेख, गणेश स्वामी, चेतन होळदांडगे, बसवेश्वर जनगावे, दीपक पाटील, सुनील जाधव, नवनाथ डिगोळे, रियाज मणियार, गजानन चेऊलवार, बालाजी काटमपल्ले, देविदास हेमनर आदिजण उपस्थित होते.

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी नुतन अध्यक्ष संग्राम वाघमारे आणि सचिव संजय पाटील यांच्या निवडीबद्दल सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार अनिल वाडकर, राष्ट्रवादी नेते शिवानंद हेंगणे, दयानंद सुरवसे, संदीप शेटे उपस्थित होते.

# पालिकेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार : नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २६ डिसेंबर :** उदगीरकरांनी मोठा विश्र्वास टाकत आपल्याला नगराध्यक्षपदी काम करण्याची संधी उपलब्ध करून दिली असून, या संधीचे सोने करीत उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहू अशी ग्वाही देत उदगीरच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. स्वाती सचिन हुडे यांनी पालिकेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

उदगीर येथील शिवनंदा फॅक्शन हॉल येथे आदिशक्ती महिला ग्रुपच्या वतीने नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणुकीत सर्वच पक्षांकडून निवडून आलेल्या महिला नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी स्वाती हुडे बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. शिल्पा संजय बनसोडे होत्या. व्यासपीठावर सौ. प्रेमाताई राजशेखर पाटील प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

प्रारंभी या कार्यक्रमामागच्या आयोजनाची भूमिका प्रस्ताविकातून महानंदा सोनटक्के यांनी विषद केली.

यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. स्वाती हुडे म्हणाल्या की, उदगीरच्या मतदारांनी मोठा विश्र्वास टाकला आहे. या विश्र्वासास पात्र राहून काम करीत असताना दिलेली आश्र्वासने पाच वर्षात पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी काम करीत असताना सर्व महिलांना सोबत घेऊन काम करणार असल्याचे सांगत महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी प्राधान्याने काम करणार असल्याचे हुडे यावेळी म्हणाल्या.

यावेळी बोलताना सौ.




शिल्पा बनसोडे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांना शुभेच्छा देत पाच वर्षाच्या काळात उदगीरच्या विकासात आपला हातभार लावण्याचे आवाहन केले.

आ. संजय बनसोडे राज्य सरकारच्या माध्यमातून नगर परिषदेला मोठा निधी उपलब्ध करून देतील त्या निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी सर्वानी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता हैबतपुरे यांनी केले. आभार प्रा. मंगला विश्र्वनाथे यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी योजना चनगे, ज्योत्स्ना समगे, सुनिता मदनुरे, विद्या पांढरे, ज्योती चौधरी, सरस्वती चौधरी, योजना चौधरी, ज्योती डोळे, सीमा तोंडचिरकर, प्रा. शकुंतला पाटील, श्रेया शिरशीकर, रेखा पाटील, उषा कुलकर्णी, प्रा सुनिता चवळे,शमीम शेख, किरण मुंडकर, अर्चना मानकरी, स्मिता पटवारी, आशा पोलावार यांनी पुढाकार घेतला.

# शेतकरी वळले कांदा लागवडीकडे



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ सह परिसरातील शिवारात काही शेतकरी कांदा लागवडीकडे वळले आहेत. येथील बुधवारच्या आठवडी बाजारात कांद्याचे रोप विक्रीसाठी येत असल्याने शेतकरी रोप खरेदी करत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यावर्षी जून महिन्यापासूनच पावसाने आशादायी सुरुवात केली होती. पावसामुळे शेती उत्पादनाचे काही प्रमाणात नुकसान झाले. खरीप हंगामात लावलेला भाजीपाला पावसामुळे हाती लागला नाही. त्यामुळे भाजीपाल्याचे भाव वधारले होते. आता हिवाळा सुरू झाल्याने भाजीपाला उत्पादनास पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या कांदा, मिरची, टोमॅटो, वांगे आदी भाजीपाल्यासह कांद्याचे रोप विक्रीसाठी शिरूर अनंतपाळ आणि नळेगाव येथील आठवडी बाजारात आणले जात आहे. अडीच ते तीन महिन्याच्या कालावधीत हे पीक काढणीसाठी येते असे शेतकरी सांगतात. तर काही शेतकरी आठवडी बाजारात कांद्याची पात विक्रीसाठी आणतात. त्यामुळे कांद्याच्या रोपास मागणी वाढली असल्याचे दिसून येत आहे. मागणी वाढली असली तरी रोप मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने कवडीमोल भावाने खरेदी करताना शेतकरी दिसत आहेत. यंदा मुबलक पाऊस झाल्याने नळेगाव येथील घरणी प्रकल्पात पाणीसाठा भरपूर असल्याने जलस्त्रोतांची पाणीपातळी चांगली वाढली. या घरणी प्रकल्पाचा शिरूर अनंतपाळ सह नळेगाव शिवारातील शेतकऱ्यांना भरपूर फायदा होतो.त्यामुळे शेतकऱ्यांना भाजीपाला लागवडीसाठी याचा उपयोग होणार आहे.

पंधरा ते वीस रुपये किलो दराने विक्री होत आहे लहान आकाराच्या रोपाचा भाव वीस रुपये प्रति किलो तर जाड बुडाच्या रोपाचा भाव पंधरा रुपये प्रति किलो दराने विक्री होत असल्याचे दिसून येत आहे. कांद्यापेक्षा कमी भाव मिळत असल्याने रोप उत्पादक शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे . रेणापूर, कळंब, अहमदपूर, उदगीर, निलंगा, देवणी येथील रोप उत्पादक शेतकरी या आठवडी बाजारात विक्रीसाठी येतात. वाहन भाडे,मजुर, व मशागतीसह इतर खर्च आणि बाजारात मिळणारा कवडीमोल भावा यामुळे रोप उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे.

# जिथे उत्पादन तिथेच विक्री; शेतकऱ्याचा मंत्र यशस्वी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २६ डिसेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील नारायण दामले या प्रयोगशील शेतकऱ्याने जिथे उत्पादन तिथेच विक्री हा मूलमंत्र प्रत्यक्षात उतरवत शेतीला नवे वळण दिले आहे. स्वतःच्या कष्टातून त्यांनी विकसित केलेल्या फळबागेतून थेट शेतातच फळविक्री करून ते इतर शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरत आहेत.

दामले यांच्या बागेमध्ये सीताफळ, पेरू, चिकू यांसारख्या विविध फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. या बागेत उत्पादित होणारी ताजी फळे ते थेट आपल्या शेतालगत रस्त्याच्या कडेला बसून विक्री करतात. या परिसरात असा प्रयोग करणारे ते एकमेव शेतकरी ठरले असून ग्राहकांकडून त्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. थेट शेतातून मिळणारा ताजा, दर्जेदार व खात्रीशीर माल हीच या



विक्रीची जमेची बाजू ठरत आहे.

केवळ बागायती शेतीपुरते न थांबता त्यांनी याला जोडधंद्याची जोड दिली आहे. दामले यांच्या शेतात गावरान पोल्ट्री व्यवसायही सुरू असून, त्यातून उत्पादित होणारी गावरान कोंबडीची अंडी ग्राहकांच्या मागणीनुसार त्याच ठिकाणी उपलब्ध करून दिली जातात.

सुरुवातीला पाण्याअभावी त्यांची शेती कोरडवाहू स्वरूपाची होती. मात्र सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे शेतात विहीर झाली. मर्यादित पाण्यावर येणारी सीताफळाची बाग त्यांनी निवडली आणि हाच निर्णय त्यांच्या शाश्वत विकासाचा आधार ठरला. विशेष म्हणजे या बागेची नीटनेटकी रचना, झाडांची शास्त्रशुद्ध छाटणी, स्वच्छता आणि सौंदर्य यामुळे येथे थांबणाऱ्या प्रवाशांना आपण शेतात आलो की एखाद्या पर्यटनस्थळी, असा भास होतो. त्यामुळे फळ खरेदीसाठी थांबलेला ग्राहक सहजपणे त्या ठिकाणी अधिक वेळ घालवतो. नारायण दामले यांचा हा उपक्रम शेतकऱ्यांनी थेट विक्रीकडे व जोडधंद्याकडे वळावे, यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी यूडीआयडी कार्ड सादर करावे : धुमाळ

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २६ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेतील एकुण २६६१ दिव्यांग (अपंग) लाभार्थ्यांपैकी १४८७ लाभार्थींनी कागदपत्रे जमा केलेली आहेत. परंतु अद्यापपर्यंत ११७४ अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे यूडीआयडी कार्ड जमा केले नाहीत त्यांची प्रकाशित केली असून अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे प्रमाणपत्र (युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड) व आधार कार्ड झेरॉक्स प्रत निलंगा तहसील कार्यालयात तात्काळ सादर करावे असे आवाहन संगायो विभागाचे नायब तहसीलदार अनिल धुमाळ यांनी केले आहे.

शासनाने संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अपंग लाभार्थ्यांचे अनुदान १५०० वरुन २५०० केले असुन सर्व अपंग लाभार्थ्यांना यूडीआयडी कार्ड जोडणे अनिवार्य केले असुन अपंग लाभार्थ्यांनी अपंगत्वाचे कार्ड व आधार कार्ड झेरॉक्स प्रत तात्काळ जमा करावी असे आवाहन केले आहे.

# कासार शिरसीत माजी विद्यार्थ्यांचा २५ वर्षांनंतर स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा**

**कासार सिरसी, दि. २६ डिसेंबर :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील श्री करीबसवेश्वर विद्यालयात सन २०००-२००१ मध्ये दहावीत शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या स्नेह मेळाव्यानिमित्त सर्व माजी विद्यार्थ्यांनी तब्बल२५ वर्षानंतर एकत्र येत पुन्हा एकदा शालेय जीवनाचा आनंद घेतला.

शाळेत केलेली मौज, एकत्र बसून केलेला अभ्यास, शाळेतील शिक्षकांची कडक शिस्त, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, चांगल्या बाकावर बसण्यासाठी ची लढाई, राष्ट्रीय उत्सव व त्यांची तयारी, खेळण्याच्या स्पर्धा अशा शालेय जीवनातील त्यावेळच्या अनेक जुन्या आठवणी काढत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. तब्बल २५ वर्षानंतर एकत्र आल्याने एकमेकांशी चांगल्याच गप्पा या कार्यक्रमात रंगल्या होत्या. तर काही माजी विद्यार्थी यावेळी भावनिकही झाली होते.

या स्नेह मेळाव्याची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर व्यासपीठावरील प्रमुख अतिथी तथा गुरुजनांच्या हस्ते



दीप प्रज्वलन करण्यात आले. व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. त्यानंतर निधन पावलेल्या गुरुजनांना व वर्ग मित्रांना आदरांजली वाहण्यात आली. व व्यासपीठावर उपस्थित प्रमुख अतिथी व गुरुजनांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. त्यानंतर प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी व्यासपीठावर येऊन कविता, चारोळी, वात्रटिका, शायरी, अशा विविध अंतर्गत कलागुणांचे सादरीकरण केले. त्यानंतर सर्व गुरुजन, प्रमुख अतिथी व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र बसून स्नेहभोजनाचा आनंद घेतला. त्यानंतर पुढील सत्रात संगीत रजनी, संगीत खुर्ची, उखाणे, प्रश्नोत्तरे, असे विविध मनोरंजनात्मक खेळ खेळण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी वयाचे भान विसरून शालेय जीवनात रमून गेले होते.

या स्नेहमिलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या प्राचार्या श्रीमती सविता मुरूमकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून या शाळेच्या इयत्ता दहावीच्या प्रथम बॅचचे(१९६१) चे माजी विद्यार्थी विश्वनाथ होळकुंदे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना होळकुंदे म्हणाले की, जीवनामध्ये आपणास काही ऋण फेडायचे असतात आई-वडिलांचे ऋण आपण फेडतोच पण समाजाचे आणि देशाचे ऋण मान्य करून ते फेडण्याचा आपण प्रयत्न करावा व आपल्या कमाईचा पाच ते दहा टक्के आपण समाज हितासाठी खर्च करावा व त्यात पर्यावरणासाठी वृक्षारोपण हा चांगला पर्याय आहे. तरुणांनी आपले गाव वृक्षांनी हिरवीगार करण्यासाठी आपल्या परिने प्रयत्न करावे असे आवाहनही यावेळी केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्षा प्राचार्य श्रीमती मुरूमकर यांनी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांना शाळेविषयी माहिती देऊन व सर्व माजी विद्यार्थ्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी व उत्तम आयुष्यासाठी सदिच्छा दिल्या.

यावेळी व्यासपीठावर श्री करीबसवेश्वर शिक्षण संस्थेचे गिरीश चिंचनसुरे, सुधीर चिंचनसुरे, एस.एस. बिराजदार, कलशेट्टी, जगताप, वरवटे, जवळगे, दीपक कदम, बसमुंगे मॅडम, राजेंद्र गोरे, उन्हाळे, वाडीकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी प्रशांत स्वामी यांनी केले तर आभार प्रदर्शन बलवीर पांडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक अमोल माळशट्टे व ऐश्वर्या हिबारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओम डिग्गे, सचिन होळकुंदे, राजकुमार डबरे, अमोल पाठक, नारायण डोंबाळे, अशा दुरुगकर, गीतांजली हबाडे, यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीचे ओमशांती तपस्या भवन विश्वशांतीदूत ठरावे- राजयोगिनी दीदी

## तपस्या भवनाचे थाटात उद्घाटन, अनेक मान्यवरांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**

हिंगोली येथील ओम शांती तपस्या भवन विश्व शांतीदूत ठरावे. तपस्या भवनाची निर्मितीसाठी संचालिका अर्चना बहेन, मार्गदर्शिका व प्रभारी शिवकन्या बहेन केंद्रासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करते असे आशीर्वचन प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या संयुक्त प्रशासिका राजयोगिनी संतोष दीदी यांनी काढले. हिंगोली येथील अकोला बायपास जवळील गोविंद नगर परिसरात प्रकाश नरवणे व परिवाराच्या भूखंड योगदानातून व ओमशांती परिवाराच्या योगदानातून सर्वार्थाने परिपूर्ण तपस्या भवन निर्माण झाले. त्याबद्दल सर्वांचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे असे म्हणून चार दशकापूर्वी हिंगोलीत मुहूर्त मेढ करण्यासाठी पाठबळ देणारे स्व. नागनाथप्पा सराफ, स्व.एकनाथदादा निलावार आदींनी सहयोग दिला आणि आज हिंगोली वटवृक्ष झाला असे उदगार ब्र.कु. शिवकन्या बहेंनजी यांनी काढले.

ओम शांती परिवारातील अनेक जण पिढ्यानपिढ्या योगदान देत असून ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय निलावार आदी सर्वांचे आभार मानतो असे ज्येष्ठ स्वंयसेवक बालाजी भाई यांनी काढून मराठवाड्यातील अनेकांचा नामोल्लेख करत ऋण निर्देश केला. संचालिका अर्चना बहेन यांनी तपस्या भवनच्या निर्मितीत प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय परिवारातील सर्वांच्या योगदानाच हे फलित असल्याचे सांगून त्या सर्वांचा सत्कार राजयोगिनी संतोष दीदी, ब्र.कु. शिवकन्या बहेंनजी, ब्र.कु.मंजुदीदी, मधुबनहून आलेले मान्यवर, योगदान देणाऱ्या हिंगोलीत मंडळींचा सत्कार केला याप्रसंगी जिल्हा शिवसेना उबाठा प्रमुख संदेश देशमुख, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, माजी जिल्हा शिक्षण अधिकारी शिवाजी पवार, पप्पू चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार, राहुल खिल्लारे आदींनी तपस्या केंद्र निर्मिती मुळे हिंगोली शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याचे आशयाचे गौरोदगार काढले. कार्यक्रमाचे संचालन आरती दीदी यांनी केले तर आभार पाटील भाई यांनी मानले. कार्यक्रमासाठी हिंगोली, परभणी, नांदेड, यवतमाळ आदी जिल्ह्यातील ओम शांती परिवारातील साधक सहभागी होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पत्रकार भिका महाराज कीर्तनकार, राऊत भाई, रवी भाई, शंकर भाई, प्रकाश भाई, घोडेकर भाई, सुधाकर भाई, सारंग भाई, मार्कड भाई, सावळे भाई, राजुभाई, मडगूलवार व तपस्या केंद्राच्या संचालिका अर्चना बहेंनजी व त्यांच्या सर्व कार्यकर्ती बहेंन भाईजी आदींनी परिश्रम घेतले. कु.अनुश्री बागुल नाशिक हिने कथक नृत्यातून ईशस्तवन केले. सर्वांनी भोजन प्रसाद घेऊन आयोजकांना शुभेच्छा दिल्या. सहभागी मंडळींनी तपस्या केंद्रात जाऊन दर्शन घेतले.

# व्यापारी महासंघाकडून आ. बांगर, नूतन नगराध्यक्षांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**

नवा मोंढा येथे शुक्रवार दि २६ डिसेंबर रोजी हिंगोली व्यापारी आसोसियनच्यावतीने शिवसेना आ. संतोष बांगर यांच्यासह नगराध्यक्ष रेखा श्रीराम बांगर व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार संतोष बांगर, युवा प्रमुख राम कदम, ॲड. मनीष साकळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

व्यापारी बांधवांच्या वतीने आमदार संतोष बांगर आणि नगरसेवक श्रीराम बांगर तसेच नगर सेवक नाना नायक, नगरसेवक साज्जाद बिल्डर, नगरसेवक कपिल खंडेलवाल, राम कदम, व्यापारी असोसिएशनचे अशोक मुंदडा, रमेशचंद्र मुंदडा, सुभाष मुंदडा हनुमानदास मुंदडा, गोविंद मुंदडा, शेखर मुंदडा, सतिश लोहिया, संजय जयस्वाल, मनमोहन सोनी, प्रविण सोनी, रमेश सोनी, शिवजी काबरा, सुभाषआप्पा येवते, पवण मुंदडा, द्वारकादास रूहिटिया, सावरमल आग्रवाल, कुणाल मुंदडा, विकास मुंदडा, देविकांत देशमुख, श्रीराम पुरोहित यांच्या सह संख्येने व्यापारी, गौमस्ता बांधव उपस्थीत होते.

यावेळी आमदार संतोष बांगर यांनी सत्काराला उत्तर देतांना आश्वासन दिले की, संत नामदेव कॉटन मार्केट यार्ड येथील हळद मोंढ्यासाठी दोन शेड तयार करून देण्याचे आश्वासन दिले, तसेच व्यापारी व शेतीमाल विक्रीसाठी घेऊन येणाऱ्या कास्तकारांसाठी स्वच्छतागृह बांधकाम लवकरच सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिले. व्यापाऱ्यांच्या सर्व समस्या तसेच अडीअडचणी सोडविण्यासाठी आम्ही सदैव तयार असल्याचेही यावेळी आ. बांगर यांनी आश्वासन दिले. यावेळी मोठ्या संख्येने शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच व्यापारी उपस्थित होते.

# अ. भा. विद्यार्थी परिषदेचे जानेवारीत हिंगोलीत अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**




अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे यंदा ६० वे देवगिरी प्रांत अधिवेशन हिंगोली शहरात २३, २४ व २५जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. अभाविप ही शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात काम करणारी जगातली सर्वात मोठी विद्यार्थी संघटन आहे. विद्यार्थी परिषद दरवर्षी आपले प्रांत अधिवेशन करत असते. या अधिवेशनात प्रांतातील मोठ्या प्रमाणात युवा तरुणाई विद्यार्थी एकत्र येतात. अधिवेशनात विविध शैक्षणिक व सामाजिक समस्यांवर सर्व विद्यार्थ्यांचे मत घेऊन त्या समस्या सोडविण्यासाठी प्रस्ताव पारित होतात. सोबतच शोभायात्रा काढली जात असून प्रांत अधिवेशनात प्रदेशाचे नूतन अध्यक्ष, मंत्री आणि कार्यकारिणीची घोषणा केली जाते. तरुणाईला दिशा, प्रेरणा व नेतृत्वाला मंच देणारे यंदा देवगिरी प्रांताचे ६० वे अधिवेशन २३,२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंगोली येथे आयोजित करण्यात आले आहे. हिंगोली येथे पहिल्यांदाच देवगिरी प्रांताचे अधिवेशन होत आहे. या पार्श्वभूमीवर अधिवेशन कार्यालयाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मा. शहर संघचालक डॉ.पुरुषोत्तम तोष्णीवाल अभाविप राष्ट्रीय सह संघटनमंत्री श्री देवदत्त जोशी आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.



**हिंगोली- नूतन पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांची शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी सदीच्छा भेट घेत त्यांचा सत्कार केला. यावेळी नगरसेवक तथा युवासेना जिल्हाध्यक्ष राम कदम, नगरसेवक सुभाष बांगर, नगरसेवक नाना नायक, माजी सभापती फकीरा मुंडे यांची उपस्थिती होती. छाया- लखन यादव**

## संक्षिप्त वृत्त

### पोलिसांकडून अवैध धंद्यावर कारवाई

हिंगोली- नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी पदभार स्विकारताच अवैध धंद्यावर जोरदार कारवाई सुरू केली आहे. जिल्ह्यातील हिंगोली शहर, वसमत शहर, सेनगाव तसेच कळमनुरी याठिकाणी प्रत्येकी १ अशा ४ ठिकाणी कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेचे गोरेगाव, कळमनुरी, औंढा नागनाथ, वसमत ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई करीत मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन, उपविभागीय अधिकारी कुंदनकुमार वाघमारे, राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले, स्थागुशाचे तसेच सर्व पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

### गणित तज्ज्ञ रामानुजन यांची जयंती साजरी




हिंगोली- हिंगोली जिल्हा गणित प्राध्यापक मंडळ तर्फे खाकी बाबा इंग्लिश स्कूल येथे भारतातील थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांची १३९ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळेस मंडळाचे माजी अध्यक्ष व गणित शिक्षक मोठा यांच्या हस्ते प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलित करण्यात आले यावेळी हिंगोली जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष धीरज शर्मा, सचिव शेख रहीम, सहसचिव अमोल कान्हेड, बाबासाहेब इंगोले, संजय खिलारे, नंदकुमार आहेर अहिरे, वाढे, हलगे आदि उपस्थित होते.

### अवैध वाळूची वाहतुक करणारे ट्रॅक्टर पकडले

हिंगोली- आखाडा बाळापूर व सापळी शिवारातून महसुल विभागाच्या पथकाने अवैध वाळूची वाहतुक करणारे दोन ट्रॅक्टर पकडले असून याप्रकरणी ट्रॅक्टर चालक व मालकावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरील ट्रॅक्टर आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात लावण्यात आले आहेत. सापळी शिवारातील वाळू घाटावरून अवैधरित्या वाळू उपसा करून त्याची वाहतुक केली जात असलयची माहीती महसूल विभागाला मिळाल्यानंतर मंडळ अधिकारी आनंद काकडे, ग्राम महसूल अधिकारी कमलकुमार यादव, विकास पंडीत, सुनील भुक्तार, विशाल पंतगे, एकनाथ कदम यांचय पथकाने मध्यरात्री पासून वाहनांची तपासणी सुरू केली होती. यामध्ये सापळी शिवारात एक ट्रॅक्टर तर आखाडा बाळापूर शिवारात एक ट्रॅक्टरमध्ये वाळू वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. पथकाने दोन्ही ट्रॅक्टर जप्त करून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात आणले आहेत. याप्रकरणी पुढील कारवाई पोलिस करीत आहेत.

# नगरसेवक श्रीराम बांगर यांच्याहस्ते दराडे विद्यालयात फिल्टरचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

शिवसेनेच्या नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांनी येथील श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी शुध्द मिळावे यासाठी पाण्याचे फिल्टर दिले. शुक्रवार दि २६ डिसेंबर रोजी नगरसेवक श्रीराम बांगर यांच्याहस्ते या फिल्टरचे उद्धाटन करण्यात आले.

नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारावेळी कळमनुरीचे शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी शुध्द मिळावे यासाठी पाण्याचे फिल्टर देण्याचे आश्वासन दिले होते. या अनुषंगाने शुक्रवारी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांनी पाण्याचे फिल्टर शाळेला भेट दिले. या फिल्टरचे उद्घाटन नगरसेवक श्रीराम बांगर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे गुड्डू बांगर, मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक डी पी डोईफोडे, पर्यवेक्षक भारत शिंदे, एस पी गहेरवार, एन टी सोळंके, गजानन बांगर, संजय गुठ्ठे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्याध्यापक डॉ अंभोरे यांनी आभार मानले.

# घटस्फोटीत महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**

सेनगाव पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात घटस्फोटीत महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची धटना घडली आहे. याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांचे एक पथक आरोपीच्या अटकेसाठी रवाना करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार नांदेड येथील राजेश बाबुराव वाघमारे उर्फ मोरे हा दीड वर्षापूर्वीपासून सेनगाव तालुक्यात एका फायनान्स कंपनीमध्ये काम करीत होता. यावेळी यसुली व इतर कारणावरून त्याचे बाहेरगावी दौरे होत होते. यामध्ये त्याचा एका घटस्फोटीत महिलेसोबत सुत जुळले. त्याने महिलेच्या असहाय्यतेचा गैरफायदा घेत तिच्याशी वारंवार संदवा साधण्यात सुरूवात केली. त्यानंतर त्याने महिलेस लग्नाचे आमिष दाखविले. तुझ्या सोबत लग्न करतो तसेच तुझ्या मुलाचा सांभाळ करतो असे म्हणत दि १३ जानेवारी २५ ते १९ सप्टेंबर पर्यंत तिला सेनगाव, नांदेड, वाशिम येथे नेऊन तिच्यावर अत्याचार केला. मागील काही दिवसांपासून त्या महिलेने लग्न करण्याचा तगादा लावल्यानंतर त्याने महिलेस टाळण्यास सुरूवात केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी त्या महिलेने सेनगाव पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी राजेश वाघमारे उर्फ मोरे याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपाधिक्षक राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दिपक मस्के, उपनिरीक्षक रवीकिरण खंदारे, जमादार सुभाष जाधव योंय पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केल. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीच्या शोधासाठी पथक रवाना केले आहे. पुढील तपास उपनिरीक्षक खंदारे हे करीत आहेत.

# तलवारीने केक कापणाऱ्या आरोपीला केले पोलिसांनी जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**

आखाडा बाळापूर येथे वाढदिवस करीत असतांना वाढदिवसाचा केक तलवारीने कापून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिसांनी आरोपीला जेरबंद केले आहे.

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर येथील जतीन गणेश परघने वय २२ रा जयभीम नगर आखाडा बाळापूर याने त्याच्या वाढदिवसानिमित्त सार्वजनिक ठिकाणी तलवारीने केक कापत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहीत पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे यांना मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने आरोपीचा शोध घेत त्याला जेरबंद केले असून त्याच्याकडून एक तलवार जप्त केली आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात भारतीय नागरिक सुरक्षासंहिता २०२३ चे कलम ३५ नुसार आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास आखाडा बाळापूर पोलिस करीत आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनमध्ये राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ डिसेंबर**

कै. ॲड. ग्यानबाराव सेवाभावी संस्थेच्या राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन आणि राजे संभाजी कला व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त पणे श्रीनिवास रामानुजन यांची जयंती राष्ट्रीय गणित दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त श्रीनिवास रामानुजन यांची प्रतिमा पूजन करून गणित विषयावर आधारित रांगोळी, भाषण आणि विविध गणित विषयाचे प्रयोग इ स्पर्धा घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा सुधाकर मेटकर उपस्थित होते तसेच प्रमुख पाहुणे माधव जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच यावेळी प्राचार्य उमेश शेळके, मुख्याध्यापक सुधाकर बल्लाळ, पर्यवेक्षक डोल्हारे, आणि श्रीकांत कान्हेड, शिवशंकर डोल्हारे, अभिषेक चाटसे, आणि शिक्षिका सुषमा पाईकराव, विद्या कान्हेड, नुतन वाबळे, राजश्री पडघन, भाग्यश्री ठोके, ज्योती मेटकर, कांचन टेकाळे इ उपस्थित होते. सूत्रसंचालन गुंजन ढगे व प्रतिभा नरवाडे याने केले आणि प्रा डोल्हारे आणि प्रा इरफान यांनी विद्यार्थ्यांना गणित विषयावर मार्गदर्शन केले तसेच आभार प्रदर्शन प्रा सूर्यवंशी यांनी केले तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणित प्रदर्शनाचे बक्षीस वितरण करण्यात आले, विद्यार्थ्यांना गणित विषयाचे महत्व सांगण्यात आले. इम्रान शेख आणि नरवाडे ताई यांनी सहकार्य केले.

# अखेर धोकादायक वळणावर लागले दिशादर्शक फलक अन् कामही झाले सुरु

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २६ डिसेंबर-**

देगलूर तालुक्यातील होट्टल रस्त्यावर अवघ्या चार दिवसांत पाच अपघात; एक ठार, अनेकजण जखमी या मथळ्याखाली दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी तरुण भारत दैनिकात बातमी प्रसिद्ध करण्यात आली. त्यानंतर दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी तरुण भारतच्या बातमीची तरुणांनी घेतली दखल; प्रशासन जागे झाल्यास कायमस्वरूपी तोडगा निघणार! अशी दुसऱ्यांदा बातमी प्रकाशित करण्यात आली. या दोन्ही बातम्यांचा चांगलाच इम्पॅक्ट प्रशासनावर पडला. झोपेत असलेले प्रशासन जागे होत धोकादायक असलेल्या होट्टल रस्त्यावर तातडीने सुचनाफलक, दिशादर्शक फलक आणि ज्याठिकाणी अतिवृष्टीमुळे रस्ता खाचला होते त्याठिकाणी मुरुम टाकण्यात आले. तरुण भारतच्या बातमीने प्रशासनाचे डोळे उघडले तर जनसामान्यांच्या विश्वासार्हता वाढली.



दरम्यान होट्टल फाटा ते होट्टल आणि पुढे करडखेड गावाजवळपास रस्ता नव्याने करण्यात आला. त्यानंतर अतिवृष्टी झाल्याने लिंगनकेरुर चढावाजवळचा रस्ता पुर्णपणे खचला गेला आणि धोकादायक परिस्थिती निर्माण झाली. यावर तात्पुरला उपाय म्हणून स्थानिक लोकांकडून काही दगड ठेवून धोका असल्याचे दर्शविण्यात आले. परंतु रात्रीच्या वेळी हे दगड न दिसल्याने अपघाताचे सत्र सुरू झाले. याठिकाणी एकाचा जागीच मृत्यू आणि अनेकजण गंभीर जखमी झाले. या अनुषंगाने दैनिक तरुण भारतने होट्टल रस्त्यावर अवघ्या चार दिवसांत पाच अपघात; एक ठार, अनेकजण जखमी या मथळ्याखाली दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी तरुण भारत दैनिकात बातमी प्रसिद्ध केली. याचाच परिणाम स्थानिक तरुणांनी बातमीची दखल घेत धोकादायक रस्ता असल्याचे दर्शविण्यासाठी लाल रंगाचे स्टिकर्स लावत पुढाकार घेतला. प्रशासनाने योग्य कार्यवाही नाही केल्यास रास्तारोको आंदोलन करण्याचेही सांगितले. त्यानंतर दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी तरुण भारतच्या बातमीची तरुणांनी घेतली दखल; प्रशासन जागे झाल्यास कायमस्वरूपी तोडगा निघणार! अशी दुसऱ्यांदा बातमी तरुण भारतने प्रशासनाचा समाचार घेतला. तेव्हा झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला अखेर जागे व्हावे लागले.

**तरुण भारत इफेक्ट**

तरुण भारतने घेतलेल्या बातमीचा इम्पॅक्ट चांगलाच पडला. आज दि. २६ डिसेंबर २०२५. (शुक्रवार) रोजी याठिकाणी थेट कामाला सुरुवात झाली. धोकादायक ठिकाणी दिशादर्शक फलक आणि सुचना फलक लावण्यात आले. यामुळे सामान्य जनतेत दैनिक तरुण भारतची विश्वासार्हता अधिक घट्ट झाले. या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशात आनंदाचे वातावरण पसरले आहे. या मार्गाने रामपूर, कुशावाडी, होट्टल, काठेवाडी, शिवणी, देवापुर, येरगी, गवंडगाव, झरी मरखेल आणि माळेगांव (मक्ता) आदीं गावातील नागरिक, शाळकरी मुले प्रवास करीत असतात. तसेच होट्टल येथे चालुक्यकालीन मंदिरे असल्याने पर्यटक आणि भाविक भक्त येत असतात. त्यामुळे हा रस्ता चांगला अत्यंत आवश्यक होते. परंतु प्रशासनाकडून दुर्लक्ष केल्याने अनेक अपघात घडले आहेत. होट्टल रस्त्यावरील अपघाताचे सत्र सुरू झाल्याने तरुण भारतने जनहितार्थ भूमिका मांडली यांचाच परिणाम रस्त्याचे काम चालू झाले. सुचना फलक आणि दिशादर्शक फलक लावण्यात आले. एकूणच या भागातील प्रवाशांची समस्या अखेरची मिटली.

**स्थानिक तरुणांचा छोटासा पण प्रामाणिक प्रयत्न**

होट्टल रस्त्यावर लिंगनकेरुर जवळील चढावाचा रस्ता अतिशय धोकादायक बनला असून येथे अपघातांची मालिका सुरू झाली होती. या अनुषंगाने आम्ही तरुण भारत दैनिकात बातमी प्रसिद्ध केली. या बातमीची दखल घेत परिसरातील शिवाजी सूर्यवंशी, राजूभाऊ दासरवाड, कैलास गाडीवान, ओमकार पाटील, गंगाधर पाटील, सतीश डांगे, गणेश पवार, बालाजी सूर्यवंशी आदी सजग तरुणांनी स्वखर्चातून तात्पुरते उपाय करण्यास सुरुवात केली आहे. धोकादायक ठिकाणी ठेवण्यात आलेल्या दगडांवर लाल रंगाचे स्टिकर्स लावून 'धोका आहे' अशी स्पष्ट निशाणी करण्यात आली आहे, जेणेकरून वाहनचालक सावध राहतील आणि पुढील अपघात टाळता येतील. या समस्येबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधींना सर्व माहिती असूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. हा आमचा तात्पुरता आणि छोटासा प्रयत्न आहे. मात्र शासन-प्रशासनाने दखल नाही घेतल्यास आम्ही सर्व तरुण एकत्र येऊन रास्तारोको आंदोलन करु अशी ठाम भूमिका या तरुणांनी घेतली होती.

**तर प्रवाशांनाचे जीव वाचले असते**

तरुण भारतच्या बातमीनंतर प्रशासन जागे होत कामाला सुरुवात केली. दिशादर्शक फलक आणि सुचना फलक लावले. परंतु अतिवृष्टीमुळे खचलेला रस्ता तेव्हाच दुरुस्त केला असता आणि दिशादर्शक फलक व सुचना फलक योग्य वेळी लावले असते तर अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचे जीव वाचले असते.



नांदेड- शहरातील वजिराबाद येथील श्री शिवाजी प्राथमिक शाळेत ख्रिसमस नाताळ सन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पंढरीनाथ काळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख शहाजी आहेर, वजिराबाद विभागाच्या इन्चार्ज गिरे, तेलंग, अविनाश नाईक, विश्वासराव गुरुप्रसाद व विद्यार्थी उपस्थित होते.

## चेअरमन पदी व्यंकट पा. उमाटे तर व्हाईस चेअरमन पदी सौ. मिनाक्षी तोटकर

**बाऱ्हाळी** -बाऱ्हाळी येथील सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी व्यंकट गोविंदराव उमाटे तर व्हाईस चेअरमनपदी सौ. मिनाक्षी राजेश्वर तोटकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथील सेवा सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाचा पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला होता. त्याअनुषंगाने नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, भाजपचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर देशमुख, धोंडीराम पाटील अस्वले, व्हाईस चेअरमन व्यंकट पाटील उमाटे आदींच्या नेतृत्वाखाली सर्व सदस्यांची पुढील कार्यकारिणी बिनविरोध यशस्वी करण्यात आली आहे. संस्थेच्या चेअरमन पदी व्यंकटराव गोविंदराव पाटील उमाटे तर व्हाईस चेअरमन पदी सौ. मीनाक्षी राजेश्वर तोटकर यांची सर्वानुमती निवड करण्यात आली आहे. नूतन सदस्य पदी व्यंकटराव ऊर्फ राजन देशपांडे, व्यंकटराव उमाटे, शिवशंकर पाटील, हणमंत पाटील अस्वले, धोंडीराम पाटील अस्वले, प्रकाश पाटील थोटवाडी, केशव पाटील इंगळे, बालाजी सोमवार, प्रकाश भंगे, शेषराव राठोड, वैजनाथ गव्हाणे, सौ. मिनाक्षी तोटकर, सौ. मीनाताई अशोक पंचगटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी सेवा सहकारी सोसायटीचे मावळते चेअरमन राजन देशपांडे, व्हाईस चेअरमन व्यंकटराव पाटील उमाटे व संचालकांचा सत्कार करून नवनिर्वाचित कार्यकारणीचे सत्कार व अभिनंदन करण्यात आले. नवनिर्वाचित संचालक मंडळाचे माणिकराव देशमुख, श्रीमती विजयाताई देशपांडे, जयप्रकाश देशमुख, मुरारजी देशपांडे, मल्हारराव देशपांडे, अरुण महाजन यांच्या आदींनी अभिनंदन केले आहे.



## डॉ. प्रशांत इंगोले यांचना पी.एचडी.पदवी

**कंधार**-तालुक्यातील ग्रामीण भागातील छोट्याशा गावातील सर्व सामान्य कुटुंबातील डॉ. प्रा .प्रशांत प्रदीप इंगोले यांना विद्यावाचस्पती पदवी प्रदान. प्रा. प्रशांत प्रदीप इंगोले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांची मानव्य शाखेतील इंग्रजी या विषयात पी.एच.डी. पदवी नुकतीच प्रदान करण्यात आली आहे त्यांनी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघिरे महाविद्यालय सासवड येथील इंग्रजी विभाग व संशोधन केंद्र मार्फत रिचर्ड पॉवर्स व कीम स्टॅन्ली रॉबिन्सन यांच्या निवडक कादंबऱ्या मधील पर्यावरण शास्त्र आणि मानवी अस्तित्व, एलेश्रेसू रपव कींरप एुळींशपलश ळप ींहश डशश्रशलींशव Novels of Richard Powers and Kim Stanley Robinson या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला होता, रिचर्ड पॉवर्स आणि किम स्टॅन्ली रॉबिन्सन हे समकालीन इंग्रजी साहित्यातील महत्त्वाचे लेखक असून त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू पर्यावरणशास्त्र आणि मानवी अस्तित्व हा आहे. रिचर्ड पॉवर्स आपल्या कादंबरीत वृक्ष, जंगल आणि मानवी जीवन यांच्यातील अतूट नातेसंबंध अधोरेखित करतो. तर किम स्टॅन्ली रॉबिन्सन आपल्या कादंबऱ्यांमधून हवामान बदल, पर्यावरणीय संकटे आणि त्यांचे मानवी समाजावर होणारे परिणाम प्रभावीपणे मांडतो. या विषयाची महत्त्वाची भूमिका म्हणजे मानवाला निसर्गाचा मालक नव्हे तर त्याचा एक भाग असल्याची जाणीव करून देणे. पर्यावरणाचा ऱ्हास मानवी अस्तित्वालाच धोका निर्माण करतो, हे दोन्ही लेखक ठामपणे मांडतात. या विषयाची समज आपल्याला पर्यावरणसंरक्षण, शाश्वत विकास आणि नैतिक जबाबदारीची जाणीव करून देते. त्यामुळे मानवी भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी निसर्गाशी समतोल साधणे अत्यावश्यक आहे. हरीभाई व्ही. देसाई महाविद्यालयाचे प्रा. डॉ. महावीर सांकला यांनी मार्गदर्शन केले. वाघिरे महाविद्यालयात नव्याने सुरू झालेल्या इंग्रजी संशोधन केंद्रातून पीएचडी प्राप्त करणारा हा द्वितीय क्रमांकाचा संशोधन विद्यार्थी आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य. पंडित शेळके, संशोधन विभागाचे प्रमुख व उपप्राचार्य डॉ. संजय झगडे व इतर संशोधन विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग आणि सहकारी आणि मित्रपरिवार यांनी त्यांचे स्वागत केले आहे.



# नित्य अन्नछत्र सेवेच्या दशकपूर्तीनिमित्त वस्त्रदान व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २६ डिसेंबर-**

शहरातील सामाजिक, धार्मिक तसेच आपत्ती व संकटाच्या काळात नागरिकांसाठी अहोरात्र झटणारे सच्चिदानंद पवार गुरुस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली चालविण्यात येणाऱ्या नित्य अन्नछत्र या सेवेला येत्या ३१ डिसेंबर रोजी १० वर्षे पूर्ण होत आहेत. या सेवाच्या दशकपूर्तीनिमित्त गरजू नागरिकांना तसेच नित्य अन्नछत्र संकल्पनेतील लाभार्थ्यांना वस्त्रदान करण्यात येणार असल्याची माहिती पवार गुरुस्वामी यांनी दिली आहे.

नित्य अन्नछत्र ही संकल्पना शहरातील निराधार, अत्यंत गरीब, अपंग, मानसिक व दृष्टिहीन तसेच वृद्ध नागरिकांपर्यंत थेट त्यांच्या निवासस्थानी दररोज अन्न पोहोचवणारी एक आगळीवेगळी व माणुसकीची सेवा आहे. संबंधित लाभार्थ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष शहानिशा करून, कोणताही गाजावाजा न करता ही सेवा



गेल्या दहा वर्षांपासून अखंड, निस्वार्थ व सेवाभावाने सुरू आहे.

थंडी, ऊन, वारा, पाऊस अशा सर्व प्रतिकूल परिस्थितींचा सामना करत सच्चिदानंद पवार गुरुस्वामी यांनी ही सेवा निरंतर सुरू ठेवली आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळातसुद्धा ही अन्नसेवा एकही दिवस खंडित न होता सुरू होती, हे विशेष उल्लेखनीय आहे. त्यामुळे शहरवासीयांमध्ये या सेवेबद्दल मोठा आदर व विश्वास निर्माण झाला असून, लोकसहकार्याच्या माध्यमातून ही सेवा आजही नियमितपणे सुरू आहे.

दरम्यान, ३१ डिसेंबर रोजी रात्री लोककल्याणार्थ नर्मदेश्वर महादेव साई मंदिर संस्थान येथे भव्य पडी पूजा, अन्नदान तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांचा लाभ परिसरातील भाविकांनी व अभंग भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

दरवर्षी अय्यप्पा स्वामींची दीक्षा घेणाऱ्या भाविकांची शहरात मोठी संख्या असते. दीक्षा कालावधीत अन्नदान, वस्त्रदान, नामस्मरण, पूजापाठ यांना विशेष महत्त्व असते. याच भावनेतून ३१ डिसेंबर रोजी इतर करमणुकीच्या कार्यक्रमांऐवजी धार्मिक व सेवाभावी उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे.

नववर्षाचे स्वागत सेवा, सद्भावना व धार्मिक आचरणातून व्हावे, तसेच अशा उपक्रमांमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# हिमायतनगर तालुक्यात बिबट्याची दहशत ; शेती कामे कोळंबली

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २६ डिसेंबर-**

तालुक्यात सध्या बिबट्याची प्रचंड दहशत पसरलेली आहे. त्यामुळे शेतीची कामे सध्या खोळंबली आहेत. मजूरवर्ग कामाला येण्यासाठी धजावत नाहीत. परिणामी शेतीची कामे होत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. पुरूषवर्ग दिवसा कसेतरी कामे करीत आहेत. परंतू महिलावर्ग कापूस वेचनी व इतर शेती कामांसाठी येत नसल्याचे शेतकऱ्यांतून सांगीतले जात आहे. रात्रीला शेतीला पाणी देणे हे जिकरीचे ठरत असून

महावितरण कंपनीने रात्रीऐवजी दिवसा लाईट द्यावी. अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

सध्या खरीप हंगामातील कापूसवेचणी आणखीण शिल्लक आहे. तर पेरलेली तूर कापणीसाठी आलेली आहे. कोरडवाहू शेतीच्या या कामांबरोबर बागायती शेतीची कामे बारमाही निरंतर चालणारी असतात. त्यामुळे बारमाही कामांसाठी मजूरांची उपलब्धता अत्यावश्याक आठवड्यात वडगांवतांडा असते. गेल्या तालूक्यातील शिवारात बिबट्याने एका शेतकऱ्याला

अगदी ताजी असतांनाच, जखमी केले होते. ही घटना बोरगडी व इतर परिसरातही बिबट्याने पाळीव प्राण्यावर हल्ला चढवित जखमी केल्याच्या घटना घडलेल्या असल्याने बिबट्याची दहशत या भागात कायमच आहे. सध्या पळसपूर भागासह इतरत्र दिवसाची लाईट नाही, तर रात्रीला या भागाची लाईट असल्याचे शेतकरी सांगत आहेत. नाईलाजाने शेतकऱ्यांना रात्रीला पाणी द्यावे लागत आहे. परंतू या भागात बिबट्याची प्रचंड दहशत निर्माण झाल्याने शेतकरी पाणी रात्रीला देण्यासाठी

भीतीमुळे जाणे टाळत आहेत. परिणामी रब्बी हंगामातील पिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. बिबट्याच्या दहशतीमुळे रब्बी पिके पाण्याविना थांबलेली आहेत. परिणामी रब्बी हंगामातील पिकांच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यातून व्यक्त होत असून, महावितरण कंपनीने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष घालून दिवसाला शेतीसाठी पाणी देण्यासाठी वीज उपलब्ध करूण दिलासा द्यावा. अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांतून जोर धरू लागली आहे.

## चालत्या गाडीस आग; एक जळून खाक

**तभा वृतसेवा**
**सोनखेड, दि. २६ डिसेंबर-**

सोनखेड ते लोहा महामार्गावर आंबेसांगवी पाटीजवळ एक भरधाव कार क्रमांक एम एच २६ ए के ६४४४ दुभाजकावर आदळल्याने गाडीने पेट घेतल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले सदरील घटना आंबेसांगी पेट्रोल पंप जवळ ची घटना आहे घटनेची माहिती समजताच सोनखेड पोलीस घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता गाडीतील चालक पूर्ण पणे जळून गेला होता गाडीच्या नंबर वरून मयत याची ओळख पटली असून मयताचे नाव शेषराव किशनराव लिंगनवार असून तो दक्षिणमुखी हनुमान मंदिर,मगनपुरा नांदेड येथील रहिवाशी आहे काही लोकांनी गाडीचा स्फोट होऊन गाडीने पेट घेतला असे सांगितल्यावर सोनखेड पोलीस ठाण्याचे सपोनि पांडुरंग माने यांनी घटनेचा सर्व बाजूने तपास सुरु असल्याचे सांगितले गाडीने कसा पेट घेतला याचे कारण अद्याप समजले नसल्याचे सांगितल्या जात आहे.

# खंडोबाच्या भक्तांसाठी एसटी कर्मचाऱ्यांनी नरसी बसस्थानकात उघडले सेवा भोजन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २६ डिसेंबर-**

दक्षिण भारतातील प्रसिद्ध माळेगाव येथील खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविक प्रवाशांसाठी नरसी बसस्थानकात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे. बिलोली आगाराचे आगारप्रमुख नरसिंग निम्मनवाड यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी स्वखर्चातून महाप्रसादाचे आयोजन करून भाविकांची सेवा केली.

नायगांव तालुक्यातील नरसी हे महत्त्वाचे मध्यवर्ती ठिकाण असून येथील बसस्थानकातून नांदेड, देगलूर, मुखेड व बिलोली या चार आगारांच्या बसेस धावतात. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी लांब पल्ल्याच्या प्रवास करीत असून तिकीट विक्रीतून संबंधित आगारांना दरमहा कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळते. नरसी बसस्थानक बिलोली आगाराच्या अखत्यारीत असून, प्रवाशांच्या सोयीसाठी येथे भौतिक सुविधा वाढविण्यावर आगारप्रमुख नरसिंग निम्मनवाड यांनी विशेष लक्ष दिले आहे. त्यामुळे सध्या नरसी बसस्थानकात नेहमीच प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येते. सध्या माळेगाव येथील खंडोबा देवाची दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा सुरू असून, दर्शना साठी येणाऱ्या भाविक प्रवाशांच्या सोयीचा विचार करत दि. २६ डिसेंबर रोजी शुक्रवार सकाळी

खंडोबा देवाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन व भंडार



उधळून यळकोट यळकोट जय मल्हारच्या घोषणा देत नरसी बसस्थानका त खिचडी स्वरूपात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या महाप्रसादाचा लाभघेताना भाविकांनी समाधान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. या उपक्रमात बिलोली आगारातील यात्रा प्रमुख शिवाजी श्रीरामे, वाहतूक निरीक्षक राजेश पवार, व्यंकटराव श्रीमंगले, चंद्रशेखर कोकणे, आजिस भाई,रावसाहेब गोदमवाड, कैलास पांचाळ, गणेश दुय्येवार, राजू आंबेकर, राजू मानेमोड यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच नरसी येथील सामाजिक कार्य कर्ते रमेश वासरे, राम खनपट्टे, पप्पू आकमवाड आदींनीही सहकार्य केले. परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कर्तव्यापलीकडे जाऊन केलेल्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, आगारप्रमुख नरसिंग निम्मनवाड यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या महाप्रसाद आयोजनामुळे एस.टी. महामंडळाची सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# वायपणा पुलासाठी सात कोटी निधी मंजूर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २६ डिसेंबर-**

हदगाव - हिमायततनगर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावा व विशेष प्रयत्नातून तालुक्यातील वायपणा गावाजवळील मुख्य रस्त्यावरील मोठ्या नाल्यावर नवीन पूल बांधण्यासाठी राज्याच्या पार पडलेल्या हिवाळी अधिवेशनात तब्बल ७.५ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला आहे.



**आ. कोहळीकर यांच्या पाठपुराव्यास यश**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी या पुलासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. कोहळीकर यांनी मान्यवरांचे आभार व्यक्त केले. या पुलाच्या बांधकामामुळे वायपना खुर्द, वायपना बुर्ज, येवली तसेच परिसरातील इतर गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पावसाळ्यात नाल्याला पूर आल्याने रस्ता बंद होण्याची समस्या कायमस्वरूपी दूर होणार असून शालेय विद्यार्थी, शेतकरी व रुग्णांची होणारी गैरसोय थांबणार आहे. नवीन पुलामुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होणार असून दळणवळण व्यवस्था अधिक मजबूत होईल यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळणार असून नागरिकांच्या सुरक्षेतेतही वाढ होणार आहे. या महत्वपूर्ण विकास कामासाठी निधी मंजूर झाल्याबद्दल वायपणा व परिसरातील ग्रामस्थांनी आ. बाबुराव कदम कोहाळीकर यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# तलबीड शिवारात जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई; सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २६ डिसेंबर-**

नायगाव तालुक्यातील तलबीड शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर नायगाव पोलिसांनी अचानक धाड टाकत अंदरबाहेर जुगार खेळणाऱ्या १२ जुगाऱ्यांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत १ लाख ८ हजार ८०० रुपयांची रोख रक्कम, ९ मोबाईल फोन व ५ मोटारसायकलींसह एकूण ६ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई दि. २५ डिसेंबर रोजी सायंकाळी करण्यात आली. तर आज दि.२६ रोजी गुन्हा दाखल



करण्यात आला आहे.

रानसुगाव येथील शेतकरी ज्ञानेश्वर व्यंकटराव जाधव यांच्या तलबीडजवळील शेतात मोकळ्या जागेत जुगार अड्डा सुरू असल्याची गोपनीय माहिती बिलोलीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्याम पानेगावकर यांना मिळताच पोलिसांनी तातडीने पथक तयार करून दोन पंचांच्या उपस्थितीत नियोजनबद्ध धाड टाकली.

धाडीवेळी अविनाश प्रकाश माचनवाड (रा. हंगरगा, ता. उमरी), शंकर गणपती देवडे (इतवारा, नांदेड), हनुमंत गंगाधर वानखेडे (रा. सावरखेड), नागोराव आनंदा गायकवाड (रा. सावरखेड), संजय शंकर बाणेवाड (रा. घुंगराळा) व गणेश बालाजी पवळे (रा. कोपरा, ता. नायगाव) शेख खादीर दस्तगीर (रा. घुंगराळा), गणपती गोविंदराव जाधव (रा. सुगाव), भगवान गणपती ढगे (रा. सावरखेड), माधव कोंडीबा सुगावे (रा. घुंगराळा), साईनाथ बाबू गायकवाड (रा. सावरखेड), माणिका बळी वानखेडे (रा. सावरखेड) हे १२ जण जुगार खेळताना आढळून आले.

पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल फोन व दुचाकी असा मोठ्या प्रमाणावर मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी पोलीस कर्मचारी बालाजी बळवंतराव शिंदे यांच्या फिर्यादीवरून नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या धाडशी कारवाईत बिलोलीचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर, पोउपनि गजानन तोटेवाड, पोउपनि सुरज तिडके, पो.हे कॉ. मुद्देमवार, भगवान कोतापल्ले, सुदाम जाकोरे, पो.कॉ गजानन चापलकर, विनोद भंडारे, गाजुलवार, अंभोरे, ममताबादे, बालाजी शिंदे उपस्थित होते. या कारवाईमुळे तालुक्यात सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यांना जोरदार धक्का बसला असून पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे जुगार चालकांचे धाबे दणाणले आहेत.